महाराष्ट्रीय आद्य चरित्रकार

महिन्द्रभट्ट संकलित

लीळाचरित्र

भाग १ ला : एकांक

संपादक

हरि नारायण नेने, एम्. ए. एल्. टी.

शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, नागपूर.

शके १८५८]

[किंमत चार आणे

No 58 B of 1936/37 Red - 4/3/37

To The D. V. Thanlist Society with best compliments H.N.Nene

महाराष्ट्रीय आद्य चरित्रकार

महिन्द्रभट्ट संकलित

ली ळा च रि त्र

भाग १ ला : एकांक

संपादक

हरि नारायण नेने, एम्. ए. एल्. टी.

शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, नागपूर.

[शके १८५८] [किंमत चार आणे

प्रकाशक – कुंअर राजकुमारी बाबू गोविंद सहाय,
C/O बाबू गोविंद सहाय, मास्तर अटेंडेंटस्, ऑफिस सिंगापूर.
स्ट्रेटस् सेटलमेंटस्, (मलाया)

मुद्रक–पां. ना. बनहट्टी, बी. एस्‌सी., व्यवस्थापक,
नारायण मुद्रणालय, सिताबर्डी, नागपूर.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण–
म० हरींद्र जीतेंद्र व्यास, महानुभाव, श्रीचक्रेश्वरमंदिर,
भालदारपुरा, प्रकाश टॉकीज जवळ, नागपूर.

प्रस्तावना

श्रीमान बाबू गोविंद साहाय, मुक्काम सिंगापूर (मलाया) यांचे मार्फत **लीळाचरित्राचा** हा **एकांक** भाग प्रसिद्ध होत आहे. सांकेतिक सकळलिपींत असलेल्या एका जुन्या महानुभावीय प्रतीवरून, साध्या बालबोध मराठी स्वरूपांत, हा भाग तयार करण्याची कामगिरी, बाबू महाशयांनी माझ्यावर सोपविली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. विशेषत: रामयात्रेच्या (रामटेकच्या) निमित्तानें श्रीसर्वज्ञचक्रधर भरवसाहून (भडोचहून) जीवोद्धरणकार्य करण्यासाठीं बाहेर पडले त्या पर्वणीच्या—चैत्र पौर्णिमेच्या—वेळीं हा भाग प्रसिद्ध होत आहे म्हणून आनंद वाटतो.

२. या भागांत लीळाचरित्रांतील पहिल्या ७५ लीळा असून, श्रीचक्रधर पैठण येथें येईपर्यंतची हकीकत त्यांत आलेली आहे. श्रीचक्रधरांना वैराग्य उत्पन्न झाल्यापासून, या गांवाहून त्या गांवाला, निर्हेतुक पर्यटण करीत, ते एकटेच हिंडत असत व पैठणला पोहोंचेपर्यंत हा क्रम चालू होता, म्हणून या प्रकरणाला 'एकांक' संज्ञा आहे. पैठण येथें 'बाईसा' यांच्या भेटीपासून तों खडकुली येथें भटोबास अथवा नागदेवाचार्य यांना बोधदान होईपर्यंत 'लीळाचरित्राचा' दुसरा भाग म्हणजे 'पूर्वार्ध' संपतो, तेथून चक्रधरांचें उत्तरापंथीं गमन होईपर्यंतचा कालखंड 'उत्तरार्ध' समजला जातो.

३. प्रस्तुत प्रकाशित प्रकरणाच्या मानानें अप्रकाशित राहिलेला लीळाचरित्राचा भाग बराच मोठा असला तरी या अल्पशा प्रमाणावरून लीळाचरित्राचें महत्त्व वाचकांच्या ध्यानांत येईल. महानुभावांना हा ग्रंथ बहुमोलाचा वाटतो याबद्दल प्रश्नच नाहीं, पण महानुभावेतरांचीं देखील अंत:करणें आपल्याकडे आकर्षून घेण्याचें सामर्थ्य या ग्रंथांत आहे. यादवकाळांतील समाजाचें बहुविध अंतरंग यांत कसें दिसून येतें व त्या वेळचे मराठी गद्य कोणत्या प्रकारचें होतें याचे नमुने आतांपर्यंत अनेकवेळां वाचकांपुढें आम्ही सादर केले आहेत. हा भाग वाचून त्याविषयीं वाचकांची पूर्ण खात्री होईल असें वाटतें.

४. श्रीचक्रधरांच्या प्रयाणानंतर **म्हाइंभटांनी** त्यांच्या अनेक लीळा गोळा केल्या व ज्यांना ज्यांना जी जी माहिती होती ती त्यांना त्यांना मोठ्या आस्थेनें पुसून, शेवटीं श्रीचक्रधरांच्या सान्निध्यांत बरेच दिवस असलेल्या नागदेवाचार्यांच्या मदतीनें म्हाइंभटांनी लीळाचरित्राची जुळणी केली. 'एकांक' भागांतील बऱ्याच लीळा महदाईसेनें सांगितलेल्या आहेत (लीळा ४, १०, १२, १३, १६, इत्यादि) असें वाचकांना दिसून येईल. ही महदंबा चक्रधरांच्या निर्याणानंतर बरींच वर्षें होती.

५ **निर्वचनप्रमेय** नांवाच्या एका महानुभावीय ग्रंथांत निरूपणाच्या ओघांत ग्रंथकारानें श्रीचक्रधरांचें थोडक्यांत जीवनचरित्र रेखाटलें आहे. त्यांतील 'एकांकाला' लागूं पडणारा भाग वाचकांना सादर करीत आहे. तो वाचत असतां वाचकांच्या डोळ्यासमोर 'एकांकांत' वर्णिलेल्या त्या त्या लीळा उभ्या राहतील.

"जेणें गुजराते भरवसी लाडसामक साके प्रधानपुत्राचें पतीत उठउनि अवतारू स्वीकरिला : **वसिाळदेओ** पिता : **माल्हाइ** माता : तेथ अनंता लीळा केलीया : (लीळा ४,५,६ पहा) परि जीवोद्धरणाचें वेसन न पुरेचि : म्हणौनि : रामयात्रा नीमीत्य करूनि : रूधिपुरासि (रिधपूर) बीजें केलें : तेथ रांधवण हाटी **श्रीप्रभुगोसावीयासि** (श्रीगुंडमराउळ) भेटि जाली : सेंगुळें बुडडें निमीत्यें उभयशक्तीचा (पर अवर-शक्तीचा) स्वीकारू केला (लीळा ७ पहा) जिवोद्धरणाचेनि वेसनें अवस्था स्वीकरूनि काटिवनें : गोंडाचीं पालिवणें सेवीली : पर्वतीं **मुक्ताबाइए** भेटि दीधली : बारा वरीखें पर्वतीं क्रीडा केली : (लीळा ८,९ पहा). आंध्रदेसीं तैल्यकारा भेटि : (लीळा ११) तेलंगातु ओरंगल प्रदेसीं भक्ता प्रेम दीधलें (लीळा १४-१५) हेडाउवा भेटि : ओरंगली वीवाहो स्वीकारू : **मल्लपूजा** स्वीकारू : (लीळा १५-१६) तेथौनि मेहकरासि बीजें केलें : **बोणेबाईयासि** भेटि दीधली : क्रमेचि बोणेबाईया समवेत प्रतिष्ठानासि बीजें केलें : (लीळा ६४, ७०, ७१ ७२,७५)"

६. कै. चांदोरकर यांचा 'पंचकृष्णा'संबंधींचा वादविवाद, श्रीचक्रधर हे ब्राह्मण होते कीं नाहीं व महानुभावांची उत्पत्ति मातंग-

पासून झाली आहे कीं काय, यासंबंधीं कांहींनीं उपस्थित केलेल्या शंका दूर होण्यास लीळा १ ते ५ यांचा चांगलाच उपयोग होईल. 'पंचकृष्णां' पैकीं श्रीकृष्ण व दत्तात्रेय यांची सर्वांना माहिती असल्यानें त्याबद्दल प्रश्नच उद्भवत नाहीं. दत्तात्रेयापासून द्वारावतीकार चांगदेव राउळ यांनीं शक्तिस्वीकार केला (लीळा १) आणि श्रीप्रभुगोसावी अथवा गुडमराउळ हे द्वारावतीकार चांगदेवराउळाचे शिष्य (लीळा ३) असून त्यांच्यापासून 'उभयशक्तीचा' स्वीकार श्रीचक्रधरांना रिधपुर येथें झाला (लीळा ७), अशा प्रकारें 'पंचकृष्णांत' कोठेंच गडबडगुंडा नाहीं हें सर्वांच्या ध्यानांत येईल; तसेंच गुजराथेचा प्रधान विशाळदेव यांचे हरिपाळदेव पुत्र होत हें स्पष्ट असल्यानें, महानुभाव म्हणजे मानभाव अथवा मांगभाव, त्यांची उत्पत्ति मांगापासून झाली इत्यादि कल्पनेला येथें कांहीं आधार नाहीं असें स्पष्ट दिसून येईल.

७. कांही लीळा चक्रधराच्या अंगांतील विशेष गुण दाखवितात ठाकुरभार्या वरप्रदान (लीळा ४४); नाथोबाला भिक्षेला कोठें जाऊं नये याविषयीं केलेला उपदेश (लीळा ३७);सामान्यस्त्रिया म्हणजे वेश्या यांच्या वस्तीच्या बाजूनें जात असतां दोघींमध्यें झालेलें भाषण; या सर्व लीळा चक्रधरांची ब्रह्मचर्याची वृत्ति उत्तमप्रकारें दर्शवितात. घोडाचुडीशिष्याशीं झालेलें भाषण (लीळा २०) व पारध्यांची सशाबद्दल विनवणी (लीळा २३) यावरून त्यांची अहिंसावृत्ति उत्तमप्रकारें प्रगट होते. अंबीनाथाचे देवळांत भिंत बांधण्यासाठी चुना तयार केला जात असतां, चुना कसा तयार करावा (लीळा ५६;) व घोड्यांची पारख (लीळा १६) व चिंचकरटां तांदुळ भाजणें (लीळा २२) यांवरून चक्रधरांचा बहुश्रुतपणा कळून येतो.

८. चक्रधर हे पर्यटण करीत असतांना नेहमीं कोठल्या तरी देवळांत उतरत असत. त्यावरून मूर्तिपूजेबद्दल त्यांची वृत्ति कोणत्या प्रकारची होती हें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. तसेंच गोकुळ अष्टमीच्या संबंधीं जी लीळा (लीळा ६६) दिली आहे त्यावरूनही प्रतीकोपासनेचें रहस्य त्यांना उत्तम कळत होतें हें स्पष्ट दिसतें. डांकरामी भिवेश्वर; सेंदुरणीं

नारायणाचें देऊळ, रामटेक; अळजपुरीं (एलीचपूर) भैरव, निर्वाणेचें देऊळ; नांदेडीं भावतीर्थ नरसिंहाचें देऊळ; लोणारीं तारातीर्थ, कुमरेश्वर; अळजपुरीं अंबीनाथाचें देऊळ; मेहंकरीं बाणेश्वर व भैरवनाथ; प्रतिष्ठानीं भोगनारायण, इत्यादि देवळांचा उल्लेख 'एकांक' प्रकरणांत आलेला आहे.

९. विविध घटनांचे उभे आडवे धागे विणले गेल्यानें समाजाचा चित्रपट तयार होतो या दृष्टीनें 'एकांक' भागाचा आपण विचार करूं.

(अ) प्रथम ऐतिहासिक दृष्टीनें, कोणते कण सांपडतात हें पाहूं. गुजराथचे राजे व देवगिरीचे जाधव यांचें सख्य नव्हतें हें पांचव्या लीळेवरून दिसतें. प्रधानपुत्र हरिपाळदेव रामयात्रेस निघाला असतां, प्रधान म्हणतो "तो देसू पारका : तेथ जाओं नैए :" अकराव्या लीळेंत **'खोलनाएकाचे आंवयो'** आले असा उल्लेख असून तेथें **'जगदळदेवो वींझदेवो'** असे अधिकारी होते असें म्हटलें आहे. आंबेगांवचे लेखांत वरील व्यक्तींचा निर्देश सांपडतो. वोरंगळ येथे चक्रधर गेले असतां (लीळा १५ वी) भैरवनाथाची भक्ती करणारा व चक्रधरांना 'पांचसहस्रांचा जोगवटा' अर्पण करणारा 'सदर्थु (सधन) मल्लदेव' कोण याचा शोध करण्या सारखा आहे. लीळा १८ मध्यें तेली व तेलीण यांना 'मेहरा व मेहरी' हे शब्द वापरलेले आहेत तेव्हां तेलाचा धंदा करणारे हे लोक कोण याचा विचार करण्यासारखा आहे. लीळा ३० मध्यें वर्णिलेलें अळजपुर (एलिचपूर) येथें निर्वाणेच्या देवळांत 'भांडारेकाराची' पूजा करणारी 'पंचोळीची स्त्री धानाबाई' इच्या बाबतींत कोठें उल्लेख सांपडतो कीं काय हें पाहण्या सारखें आहे. लीळा ४१ मध्यें **सींघणाचा कन्हरदेव** (शके ११६९-८२) **लोणार** येथें येऊन त्याची व चक्रधरांची भेट होऊन कन्हरदेवानें दिलेल्या 'आसूंचा' (सुवर्णनाण्यांचा) उपयोग 'कुमारेश्वराची पाळीं बांधण्याकडे झाला याचें वर्णन आलेलें आहे. लीळा ५४ यामध्यें झाडीमंडळाचा उल्लेख असून **रामदरणा** स्वारीवर निघाल्याबद्दल सांगितलें आहे. "रामदरणेनि मनोर्थु केला : जे : एवेळेची कटकै परते कां : तरि : मी गोसावीयातें गांवा घेउनि जाइन : तवं कटकै परतावी ऐसीया ज्वाळीया

आलीया : गोसावीयासि आरोगण : मग लिखीतें वाचली : "इत्यादि उल्लेख विचार करण्यासारखा आहे.

(आ) द्वारावतीकार चांगदेवो राउळ यांचे अनुगृहीत 'राजगुरु असलेले कानयच्च (काटोल) 'वयस्तंभिनी' विद्या देणारे हटयोगी (लीळा १०); शिष्याबद्दल मत्सर करणारे पंचकौळाचार्य (लीळा १९); घोडाचुडीचे तामसी हटयोगी शिष्य (लीळा २०); भांडारेकारांच्या मृत्युसमयीं 'भटो' काळवंचना करू अशी पृच्छा (लीळा ३२); विष्णु-स्वामीची 'घुटिका सिद्धि' (लीळा ४७) चक्रधराचे निरनिराळया लोकांना स्थित्यानंद देणें, इत्यादि भाग वाचले म्हणजे नाथपंथ व हटयोग यांची आठवण होऊन त्याविषयीं चक्रधरांची वृत्ति कशा प्रकारची होती याचें ओझरतें दर्शन होऊन, महानुभाव पंथ नाथसांप्रदाया पासून अथवा बौद्धसांप्रदायापासून निघाला काय या प्रश्नावर प्रकाश पडेल.

(इ) दुसऱ्याचा ज्वर आपण घेणें; न्हाण्यासाठीं लोणी देणें; मरणाच्या वेळी मांडी उशीला देणें, एखादी जखम झाली असतां तोंडांतील विड्याचा गोळा त्यावर बांधणें, सारीचा व रानभेरीचा खेळ, जो अगोदर शिकार मारील तो त्या शिकारीचा धनी, दोघे संन्यासी वाद-विवाद करूं लागले, तर जो जिंकेल त्याला पुस्तकें, मठ वगैरे मिळणें, गोकुळअष्टमीचे दिवशीं मातीचें गोकुळ करणें, सोमवती अमावास्या, सिंहस्थ इत्यादि पर्वण्या, तीन मुदा करून दृष्टिवैर चूकविणें, अंगांत भूत-संचार झाला असतां खांबाला बांधून त्याला बोलावयास लावणें, इत्यादि अनेक चालीरीती व समजुती दिसून येतात. तसेंच चोरी केली असतां हातखोडा घालणें, मोठी शिक्षा म्हणजे चुनखडींत पाणी घालून त्यांत बसवणें, वेठीला धरणें वगैरे प्रकारही आढळतात.

(ई) १ जुन्या मराठी गद्याच्या दृष्टीनें कितीतरी गोष्टी उघडकीस येतात. नुसत्या पदार्थांच्या निरनिराळ्या नांवाकडे पाहिले म्हणजे कितीतरी जुने शब्द सांपडतात; जसें:–ताटी, पुडु, वाटवा, सूपवती, बोली सांउलें, दुटी, त्रिवडी, पासवडी, खांडे, पाउडें, इत्यादि.

२. आहणी (वायकी), सेवनी (सीमान्तपूजन), उधाणी (वादविवाद), लिखितें (पत्रें), बाळाणा (गवाक्ष), गुणीए (पंचाक्षरी), कळदिवा (लामणदिवा), गोधोळीचें लग्न (गोरज लग्न), पाहानपटी (पहाट), पाखाळा (पखाल), इत्यादि आतां प्रचलित नसलेले शब्द दिसतात.

३. पटिसाळा रिचवली (खाली आली, मोडली), मूळ येणें, मोडणें (खो घालणें), भुंको लागणें (निंदा करणें), निबंध काढणें (पोथ्या-पुस्तकाचे आधार न्यायदानासाठीं पाहणें), फुलौर बांधणें इत्यादि वाक्प्रचार आढळून येतात.

४. वाक्यरचनेच्या दृष्टीनें पुढील वाक्यें चिन्तनीय आहेत. 'रामु देखिजैल : तै : मर्दना : मादनें : व्याळी : हे आरोगणा करी तरी गोगाळण्ही आण; माणुसें माळवधां वरूनि पाहतें असति; मग तुम्हां आरोगणा देउनि (आम्ही देऊं); या मूनिदेया, आम्हीं भिक्षा मागौनि घेउनि; जे एवेळींची कटकै परते कां : तरि : मी : गोमावीया गावां घेउनि जाईन; आम्हापुढें सांघनीति कां : तरी आम्ही घेतो कीं; एक ऐसा निगाला, एकु ऐसा निगाला; इत्यादि.

उत्तम गद्याचे नमुने या एकांकांत पुष्कळ आहेत.

१० या पोथींत कोठेंही कोणत्याही घटनेचा शककाल दिलेला नाहीं. 'सिंहस्थ आला' असा उल्लेख ७२ व्या लीळेंत आहे; पण तेथें शक नाहीं. लीळाचरित्रांचें समग्र अवलोकन झाल्याशिवाय व त्यांतील निरनिराळ्या घटनांचा सुसंगतपणानें विचार केल्याशिवाय कोणत्याही एखाद्या उल्लेखावरून कालानुमान करणें धाडसाचें आहे असें आमचें प्रामाणिक मत आहे.

११. बाबू सहाय यानीं लीळाचरित्रासारख्या योग्य ग्रंथाच्या प्रकाशनाठीं मदत केल्याबद्दल, तसेंच प्रो. नी. व. भवाळकर यांनी छापण्याच्या कामीं योग्य सूचना केल्या म्हणून, त्यांचे आभार मानून ही छोटीशी प्रस्तावना संपवितों.

नागपूर, वर्षप्रतिपदा
शके १८५८, ता. २४-३-३६

हरी नारायण नेने
शिक्षक, पटवर्धन हायस्कूल.

लीळाचरित्र

एकांक

श्रीपरेशाय नमः ॥०॥ फलेठाणी कऱ्हाडेया ब्राह्मणाचां घरीं अवतारू स्वीकरीला : मग : केतुले एक दीस राज्य केलें : एकदिनीं श्राध जालें : तें गोसावीयां भार्या रतीचीया चाडा विनविलें : आणि : गोसावीयासि तेव्हळिं ब्रह्मचर्याची प्रवृति : मग : तें निमीत्य करूनि : मातापुरा बीजें केलें : तेथ देव-गीरीवरि बीजें करीतां : श्रीदत्तात्रएप्रभु : व्याघ्राचा वेखु धरूनि जाळि तळुनि बीजें केलें : हाक दीधली : श्रीमुगुटीं चवडा ठेविला : लोकू भीयाला : तो पर्ता केला : तेथ शक्ति स्वीक-रिली ॥ अवतारू स्वीकरीला : ऐसी एकि वासना ॥ जवं लोकू द्वारावतीए जाए तवं गोसावी तेथ होते : मग बीजें केलें द्वारावतीए ॥१॥

गोसावी द्वारावतिएसि खराटेवरि बीदी झाडीति : मग : सूपीं पूंजे भरिति : श्रीमूगुटावरि ठेविति : गोमतीए मध्यें घालीति : सूपें मार्गु प्रगटे : खराटेनि विद्या ॥२॥

श्रीप्रभु द्वारावतीए बीजें केलें : संन्यासू स्वीकरीला : मग : रीधपूरा बीजें केलें : तेथौनि मागौतें द्वारावतीये बीजें केलें : गोमतीएचां तीरीं जपत होते : पुढां : दंडु रोवीला असे : तेथ गोसावी बीजें करीता वरि सूप ठेविलें : वरि खराटेनि हाणितलें : दंडु मोडुनि गोमतीए मध्यें घातला : तेथ श्रीप्रभु शक्ति स्वीकरीलि : दुसरी वासना : अवतारू स्वीकरीला : मग रीधपुरा बीजें केलें ॥३॥

हीवरळियें महदाईसीं पुसीलें : जी : जी : द्वारावतीये गुंफेसि गेलीयें : तवं तेथें एकु महात्मे होते जी : तयांचीये तोंडौनि रूपेचीया सरीया ऐसीया निगति : तरि ते काइ जी : तवं सर्वज्ञें म्हणीतलें : ते तयांची लाळ जी : मीयां त्यातें पूसीलें : आपणयांसि नांव काइ : **माहादेओ मूनि** : आपण कवणाचेयां आनोग्रहीत **अनंत** मूनीचेया : ते कवणाचे : ते **श्रीचांगदेओ राउळाचें** : ॥ श्री चांगदेओ राउळीं बीजें कैसेयां परी केलें : तें आम्हीं नेणों : तरि : तुमचे अनंतमूनि काइ म्हणति : वीद्या आणि पुरुषू माहाराष्टरी असे : तुम्ही काइ म्हणा : आम्हि अनंतु अनंतु म्हणों : बाइ : तें ते केवि जाणति : तें कव्हणिचि नेणें : तें एथौनि तुम्हासि सांघिजैल : ॥ :

काउराळिची कामाख्या : प्रसिधि आइकौनि : रतीचीया चाडा तेथें आली : देवतेची आज्ञा लंघौनि साउमेया न वचवे : तेथ ब्रम्हचर्याची प्रवृति : म्हणौनि : बाहेरीं बीजें न करीति : ऐसी सात अहोरात्रें उभी होती : तिएचा आग्रहो देखौनि तें पुर त्यजीले : तिए समइं गुजरातेचेया प्रधानाचेया कूमराचें देह

गेलें : तें समसाना आणिलें होतें : तेव्हळि तें स्वीक-
रीलें ॥ आणि महादाईसीं गोसावियातें पुसीलें : हां जि : आमचे गोसावी काइ हें गुजराथेचेया प्रधानाचे कुमरू : हां जि : मग : निगों कैसें दीधलें : या उपरि रामयात्रेची गोष्ट सांघीतली : ॥

महदाईसीं बीढारीं म्हणीतलें : आबै आबै : द्वारावतीचे चांगदेओ राउळ तेचि आमुचे गोसावी होए वो रूपै : ऐरी दीसीं आली तेव्हळि सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : **तैसां स्थानीं तैसिया तैसिया गोष्टी तिया न कीजत कीं** : जि जि : गोसावी कैसेनि जाणितलें : सर्वज्ञें म्हणीतलें : **बाइ जाणिजे ऐसें हेतु घातु तवं** : हेतु घातु तवं कैसें जाणिजे : पां : **जाणिजे ऐसें तुम्हा उठितां बैसतां** ॥४॥

पुर स्वीकरीलें : वास पाहों लागलें : आवघेयाही हरीखू जाला : कूमरू जीयाला : कूमरू जीयाला : मग गोसावी नगरा-मध्यें बीजें केलें : **कमळा आइसासीं** सेस भरिली : गोसावी तयाचे गुणधर्म स्वीकरीलें गोपाळमंत्री दीक्षा : गोपाळण्ही आण : जोआंचें व्यसन : राणियेचा पढीयावो : हरिपाळ नांव : प्रधान कुशळु : तेणें दरे दरकुटे : सोधविलें : पुरुषें उठविलें असैल : म्हणौनि : आपूलीये राणिए करवि पूसविलें : **कमळाइसातें** विहरणीचीया खूणां : तीहीं आधीलीचि सांघीतलीया : अना-रीसीया नाहीं ॥५॥

गोसावी केतुले एक दीस राज्य केलें : पूत जाला : गोसावी सारीचें जुं प्रत्येहीं खेळति : जींकति : म्हणौनि : हारि स्वीकरीली : बहुत द्रव्य हारविलें : जुआरीं म्हणीतलें : जि जि :

हारविलें असे तें वेचिजो : दीजो : मग : खेळिजो : मग : गोसावी तेथौनि बीजें केलें : दारवठा जुआरीं म्हणीतलें : जि : जि : गोसावी आमुचें आधीं देयावें : मग : भीतरीं बीजें करावें : सर्वज्ञें म्हणीतलें : तुमचे दीधलेयावीण : हे आरोगण करी : तरी गोपाळण्ही आन : गोसावी भीतरीं बीजें केलें : कमळाइसातें म्हणीतलें : आपूला अळंकारू आणा : तेहीं म्हणीतलें : कां : एथौनि : जूं : हारविलें : तयातें म्हणीतलें : तुमचें दीधलेयावीण हें : आरोगण : करी : तरि गोपाळण्ही आन : कमळाइसीं म्हणीतलें : आम्ही देओं तरि आम्हां तेचि आन : मग : गोसावी : उपरीयेवरि पहुडु स्वीकरीला : माता मर्दनीया पाठविला : सर्वज्ञें म्हणीतलें : क्षुधा नाहीं : माता उठवावया आली : गोसावी नुठति : मग माता कमळाइसातें पुसों लागली : तेहीं मागील वृतांतु सांघीतलें : प्रधान राउळौनि आला : आणि पुसीलें : गोसावीयां आरोगणा : राणियां म्हणीतलें : नाहीं : आजि आझूइ कां नाहीं : मग : तेहीं मागील वृत्तांतु सांघीतलें : मग प्रधान गोसावीयापासि आला : गोसावी पहुडले असति : उपगळिए घेउनि उठविलें : मग पुसीलें : आजि आझूइं आरोगण कां नाहीं : सर्वज्ञें म्हणीतलें : एथौनि जुं हारविलें तयातें म्हणीतलें : तुमचें दीधलेयावीण हें आरोगण करी तरि गोपाळण्ही आन : प्रधानें म्हणीतलें : जोडीलें असे तें तुझें नव्हे : प्रधानें वाखारी आणवीलि जूआरीयांचें द्रव्य पाठवीलें : मग : गोसावीया आरोगणा जाली : ॥६॥

एक वेळू सर्वज्ञें म्हणीतलें : रामयात्रे जावें : प्रधानें

म्हणीतलें : तो देसू पारका : तेथ जाओं नै ए : ऐसें मोडीलें : गोसावी व्रत घेतलें : रामू देखिजैल तै : मर्दना : मादनें : व्याळी : गोसावी ताक भातु आरोगण करीति : मूर्ति कृश जाली : गोसावीयांचीया माता म्हणीतलें : प्रधानातें : सौंदर मूर्ति कृश जाली : दुवाही राउत पाइक जाति तैसा पाठवावा : केतुलेनि एके परिवारेंसीं दांडिएवरि आरूहण करूनि बीजें केलें : सरिसा उगाणा : कोठी : चाटे : बडुवू : तैसे निगाले : पेणें प्रति एकूएकें नीरोपेंसी एकूएकातें पाठवीति : मग : दोघेजण सरीसे होते : तयातें चुकौनि गोसावी परमेश्वरपुरा बीजें केलें : श्रीप्रभु : रांधवण हाटीं क्रिडा करीत असति : स्याम मूर्ति : नाभि चुंबित खाड : उतरिए वस्त्र : गगनाची वास पाति : आपणेया आपण बोलत रांधवणाचां घरीं तिहीं पदार्थांसीं खेळ करीत असति : ते क्रीडा आमचे गोसावी पांत असति : श्रीप्रभु राधवणीं सेंगुळें बुडडें वोळगविलें : तें श्रीप्रभु प्रसाद करूनि : आरे : घे घे : घेना म्हणें : ऐसें भणौनि : गोसावीयाकडे टाकीलें गोसावी वरिचेयावरि झेलिलें असता वरि धरिलें : मग आरोगिलें : तेथ गोसावी ज्ञानशक्ति स्वीकरीलि ॥७॥

गोसावी अवस्था स्विकरिलि : मार्गीं चालावेयाची प्रवृत्ति नाहीं : कांटेयां केसकळाप गुंपति : ते वारेनि उगवति : कां : कव्हणिं मनुष्य उगवी तेव्हळि : मूर्ति वोरखडे : कांटे रूपति : असूधाचे बींदु नीगति : ते साहाज पन्हरेयावरि मानुकूली तैसीं मीरवति : ॥८॥

पर्वतीं बारा वरिषें क्रीडा केली : एकुदिनीं मुक्ताबाइसीं

दर्सन जालें : आपुलेया आश्रमा घेउनि आली : वनपुष्पाची पूजा केली : कंदमूळफळांची आरोगणा दीधली : तयासि म्हणीतलें : इतुकें ही तप केलें : तयाचें फळ आजि जालें : पाहाळीं गेलीं लोंवं : चूंभळी वळीलीं नखें : भुइं काढती जटे : मूक्ताबाई ऐसें नांव ॥९॥

महात्मेहो तुम्ही श्रीप्रभुचेया दर्शना कां जा : जि : आमुचे परगुरु म्हणौनि : तुमचे परम गुरु ते कांतीए असति : मग : कांतीएची लीळा सांघीतली : ॥

कांतिएची लीळा : कांतिएसि (काटोल) पाणिपात्र करावेया नगरामध्यें बीजें केलें : तेथ द्वारावतीकारांचे अनुग्रहीत राजगुरू होउनि वर्तत असति : तेहीं उपरिए वरूनि देखीलें : आपूलेया सीष्याकरवि बोलाविलें : तेथ : गोसावीं : बीजें केलें : तीहीं म्हणीतलें : ऐसा पींडु : मा : ऐसा कां उपेक्षीला : गोसावी उगेचि होते : मग : तीहीं विद्या संक्रमू आदरिली : गोसावी : न : स्वीकरीति : तिहीं म्हणीतलें : पुरुषु हटिया असे : मग : तिहीं म्हणीतलें : जी जी : आमत्तें वयस्तंबनि विद्या (वय-तरुणपण-कायम ठेवणारी विद्या) असे : तिया पींडु धरे : ते स्विकरावी जी : मग : स्विकरीली : महदाइसीं पुसीलें : जी जी : गोसावी विद्या स्विकरीली : तरि : तयांसि काइ जालें : तयांची वीद्या अपूर्ण होत ते संपूर्ण केली : जाली : ॥१०॥

पंचाळेश्वरीं पींपळा तळिं उभे असति : आणि आपेगांवींचा अनंत देवो ब्राह्मणु तयासि अभियोगु जाला : तयातें

मारावेया पाठीं लागले : अनंतदेवो पुरांतु घालुनि गोसाविया पासिं आले : इतुलेनि तयांची रोषबूधी गेली : गोसावीयासि गुंफा करावेयाची प्रवृति : तयातें पुसीलें : तुमचेनि कुदळी पाउडें जोडे : जी जी : परि : मज अव्हिलाओ आला असे : जी : ते मातें मारावेया पाठीं लागले : मीं गोसावीयाकडे आलां : मग : ते राहिले : जा तुमचे कव्हणीं कांहीं न करी हो : मग : ते मागुतें गावां गेले : तवं एरांची वोखटी बूधि निवर्तली : तयातें क्षेमावीलें : मग तीहीं घरूनि कुदळी पाउडें गोसावीयापासि घेऊनि आलें ॥ रामेश्वरबास ॥ गोसावीयाची पूरता उपहारू आणिला : मग गुंफा करीतां : बाइसीं म्हणीतलें : बाबा : बटिकूरें काइसेया सीनवीजतें असीजति : बाबासि काइ एथ टाकलें असे यावरि तैल्यकाराची गोष्टि सांघितली : ॥ अंध्रदेशीं एकाकी असतां एकी गावीं तेलीया एकाचेया घरा : पाहानपटीं बीजें केलें : उदेयासिचि : तवं तो तेली नदी हात पाए धों गेला होता : तयाची तेलीणि आंगणीं बाजसूपवतीए वरि नीजैली होती : तिएसवें गोसावी पहुड स्वीकरीला : तयाची पासवडी पांगुरौनि : तवं ते गजबजौनि उठिली : मेलिये वो मेलिये : वो : मज सरीसा कोणुनेणो एकू नीजैला : ऐसी वोबाति बाहीरि नीगाली : तेथ मांदी मीनली : एक तेयां पुढां सांघों गेलें : आगा : तुझीए स्त्रीए सरीसा कोन नेणों एकूं निजैला : तेणें आपुला नीएमु सारीला : मग : आला : खांडें घेउनि : गोसावी श्रीमूख पांगुरौनि पहुडले होते : तेणें पासवडी आसूडिली : आणि : श्रीमुख देखीलें आणि रोखबुधी नीवर्तली : हातीचें खर्ग गळौनि

गेले : एया लींगा : माझेया घरा सोमनाथु आला : मलीनाथु आला : अवघे जा जा तुम्ही : ए ए : गोसावीयाचेयां श्रीचरणा लाग : आजि तुं जेतुलेंही जाणसि : तेंतुलेंहीं रांधि : आपण हाटां गेला : पूजासाधन : तांबूळ : सरें घेउनि आला : सरे वोळगविलीं : बाइ : तै सराचें दी : मूठी एसणीं सरें : मग : सरें आरोगण केली : मग मर्दना दीधली : मादनें जाली : सलादिचा धुवटु वोलि साउला वोळगविला : पूजा केली : सर्वज्ञें म्हणितलें : बाइ : तो सांप्रदाएकु पूजा करूं जाणे : मग आरोगणा जाली : गुळळा जाला, फोडी वोळगवीलीया : विडीया करूनि दीधलीया : बाज सूपवटी झाडीली : गोसावी पहुड स्वीकरीला : तेचि थाळा ताटीं आपण दोघें बैसली : दैवभाग्य आमुचें : ऐसें सूख अनुमोदितें जेविलीं : मग एकू श्रीचरण एकें घेतला : तथा दुसरा श्रीचरण एकें घेतला : चरण संवाहन केलें : मग गोसावी पहुडले : पाठीं सागळ भरूनि ठेविली : तियेंहीं नीजलीं : रात्रि तृषेची प्रवृति जाली : तिए गावीं तुंगभद्रा नावें नदी : तयांची वस्त्रें परित्यजुनि आपलीं घेउनि तेथ बीजें केलें : उदक प्राशनकरितां थोंब खचलें : मूर्ति झळंबिली : तैसेंचि पूरामध्यें बीजें केलें : मग उदयांचि गोवळरुवें म्हणों लागलीं : आरे : माणुस एक पूरें एताए रे : मूर्ति जेथ थडीए लागली : तेथ बीजें केलें : ऐसी लीळा सांघीतली : मग सर्वज्ञें : म्हणीतलें : बाइ : तै तैसी प्रवृत्ति : जें : तान्हैलेयां पाणी पेओं न मगीजे : घेया घेया : माझे बापे : दुसरी वासना : आतां एथें ऐसी प्रवृति : घेया घेया बापेया : वेगु करा : मग : गुंफा

करविली ॥११॥ गावां एका बीजें करीतां मार्गा पव्हे : गांवीं एकीं पव्हे : तवं चाम्हारू आणि चाम्हारी हाटां गेलीं होतीं : तीये आलीं : चाम्हारें दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागला : गोसावि सौंदर्य देखोनि पाहों लागला : तथा पुड्ड बाड्डया सोडिला : फोडी वोळगवीलीया : विडीया करूनि दीधलिया : तवं मागिली कडौनि : चाम्हारि आली : उठीसिना गा : गावां जाओं : पारूख : पारूख : पुडतीं तिया म्हणीतलें : त्रिसूधी तेणें तैसेंचि उत्तर दीधलें : हां गा : तु न एसि : न यें तरि माझिए माथाचां हाट्ट फेडी : फेडिला जाए : कोण साक्षी : गोसावीयां कडे दाखवीलें : हा देव हो : गोसावी तें मानिलें : मग : तें नीगाली : मग : तयासि गोसावीया पासौनि स्थिति : तयातवं देवभाव : मी कवण काइ : ऐसें वीसरलें : ते लोकीं गोसावी होऊनि वर्तति : ते विचरत विचरत खोल नाएकाचेया आंबेया आले : तेथ ईश्वरपुरुषु म्हणौनि घरोघरीं जेवावेया नेति : एक आपुलेया घरीं घेउनि गेले : पूजा केली : जेऊं सूदलें : तया पुरुषाचीए गाविचे चाम्हार तेथ हाटासि आले : तेहीं म्हणीतलें : हारे : हा आमचिए गावीचा चाम्हारू नव्हे : एथ देओ जाला : एणें गावां विटाळिला : ऐसें एरू पुसे एरू पुसे : आवघाइ आइकीलें : तै जगळदेवो वीझदेओ अधिकारीयें : तेहीं स्मार्त बोलाविलें : नींबंध काढविलें : तिहीं म्हणीतलें : चुनेयाचेयां खडेया मध्यें बैसवावे : मग : पाखाला सोडाविया : तिहीं तयां पुरुषां तैसेंचि केलें : तवं मांदी देखौनि पैली कडौनि एकीं एकातें पुसीलें : तीहीं म्हणीतलें तया पुरुषां तैसेनि तैसें केलें : मगं : एरीं म्हणीतलें : तुम्ही तयासि काइ

कराल : ते पैऱ्हां हाटां आंतु गळा माळ : तोंडी तांबूळ : ऐसे खेळत असति : तयांचिए गळांची माळ सूकेचिना : मग : महदाईसीं पुसीलें : हांजि : तयांसि काइ जालें : सर्वज्ञें म्हणीतलें तया तवं तयाचा नीर्वंसू जाला ॥ १२ ॥

हींवरळीए आपलो उपरि हे लीळा सांघीतली : बाइ : हें जुं खेळे : हें जींके : परि हारवीना ॥ गावीं एकीं जूआठे-यासि बीजें केलें : जूआरियांतें म्हणीतलें : धुरे एकी पवाडु आति : एइजो जी : म्हणौनि : ते परते सरले : पवाडु केला : मग : गोसावी खेळों लागले : बहुत कवडे जीकीले : लाहान कुरंगे कवडे वेंचिले : पवींत दीधले : वेगळे कवडे केले ते श्रीकरीं घेउनि दोंदेंसीं धरिले : रांधवण हाटां बीजें केलें : तेथ म्हणीतलें : कवडा जेवन अंन जोडे वो : एइजो जी : म्हणौनि : एकीं बोलाविलें : कवडे तयांसि दीधले : तिहीं मर्दना दीधली : मादनें दीधलीं : तिहीं आपुलीं वस्त्रें वोळगवीलीं : महीमेसारखी आरोगणा दीधली : मग : गोसावीयांसि आरोगण करीतां तया अंनासि रूप करीति : तेणें तयासि सूख होए : मग : तेहीं बाज सूपवती घातली : मग : पहुड स्वीकरीला : उदयांसीं फीटे तवं तेथें असति : मग तयाचीं वस्त्रें ठेउनि जुआठेयां बीजें करीति : हाटवतीएचीं मानुसें आपुलाला व्यापारू सांडुनि गोसावीयातें अवलोकीति : जवं देखति तवं : भाट : विदावंतें : वाट पाहाति : कालीचा जगदानि तो आझुंइ न ए : तवं बीजें केलें : तिएहीं दीसीं जींकति : आरोगणे पुरते ठेवीति : एर वेचीति : तिए दिसीं आणिका घरां बीजें करीति : आधली

दीसीचिया रांधवणी दुना लोभ होए : तियें गोसावीयोंची वाट पाहातें असति : यापरि तेथ केतुले एक दीसु होते : मग बीजें केलें ॥ १३ ॥

वोरंगळ प्रदेशीं गावीं एकीं पाणिपात्रासि बीजें केलें : सेवटिली एकी घरीं ब्राह्मणें एकें म्हणीतलें : जी जी : गोसावी ए नगरीं जवं असति : तवं माझीए घरीं उपरी असे : तेथ बीढार करावें : माझी बहीणि सेवादास्य करील : गोसावी विनती स्वीकरिलि : तेथ बीजें केलें : उपरिए वरि बाज सुपवती घातली : केतुले एक दीस तेथ होते : ऐसां लोकु भकों लागला : कोण्हीं कांहीं बोले : कोण्हीं कांहीं बोले : तेहीं म्हणीतलें : मीं आपुलां डोळां देखैन : मग : जें करावें तें करीन : मग : ते पाहों ठाकलें : तवं : गोसावी पहुडलें असति : ते बाई : पोटकुळीया दे : थापनीती होती : तयासि तैसाची डोळां लागला : आणि : तिची डोइ मूर्ति लागली : दुसरी वासना : गोसावी पहुडले असति : ते बाइ : चरणसंवाहन करीति होती : तैसीचि निद्रा आली : ऐसें देखोनि तिहीं म्हणीतलें : हें नव्हे : हे प्रवर्तवीति असे : मग : ते क्षोभले : खांडें काढुनि : खर्ग घेउनि : ओखटीया बुधी आले : तवं गोसावी श्रीमुख उघडुनि : कृपादृष्टि अवलोकुनि प्रेम : उत्तमसाधन संचरिलें : तैसेंचि बीजें केलें : ते भक्तही सरिसें नीगालें : मास दोनीं संनिधानीं : ऐसा केतुलेयां एकां काळां : सर्वज्ञें म्हणीतलें : भटो तुम्हीं ए गावीं असा : हे पैली गावीं असैल : मासा पाखा : मग : ते भक्त गावींची सींववेन्ही एति : तवं : गोसावीचिए गांवीहुनि ब्राह्मणु एकू कन-

वृतिसि ए : तयातें ते नीच पूसति : हां भटो : तुमचां गावीं : पुरुष एक असति कीं : गौर श्रीमुर्ति : लांबकान : विसाळनेत्र ऐसिया खुणा सांघति : ते नीकेनि असति : तो म्हणे : नीकेनि असति : सींव्रेसि एउनि ऐसें प्रत्येंही पुसति : एकुदीनीं तेणें ब्राह्मणें म्हणीतलें : स्त्रियां पुरुषाचा ऐसा वेधु नाहीं : पुरुषां पुरुषाचा काइसा वेधु : पां : ऐसें म्हणौनि म्हणीतलें : आन (अन्य) सांघीतलें : तें तुम्हीं नेणा : तें तसेंनि तैसें वर्तले : सर्प नीमीत्यें हां भटो सत्य : ना : सत्य : ऐसें त्रीसूधि पुसीलें : तिहीं सत्यचि म्हणीतलें : तसेचि ते भक्त उभेचि पडले : देहत्यागु केला : देह विसर्जिले : मग : तो ब्राह्मणु भीयाला : गोसावीयांपासि आला : अवघें वृत्तांत सांघीतलें : सर्वज्ञें म्हणीतलें : हां भटो ऐसा सत्यही अर्थु न सांगिजे : न बोलिजे : मा एसणें असत्य कैसेनि तुम्हां बोलावलें : मग : कुदळी पाटी घेववीली : त्यासि नीक्षेपू करवीला : बाई : यासि तेथ मग राहावेंचि ना : हें तेथौनि नीगालें ॥ १४ ॥

गोसावी वोरंगळासि बीज केलें : तिये गावींचा सदर्थु मालु : तयासि भैरवनाथाची भक्ति : तो तेथ एतु होता : मार्गी तयासि दर्सन जालें : दांडिए खालौति उडी घातली : गोसावीयांतें दांडी वाउनि आवारा घेउनि आला : मग : मर्दना दीधली : पुजा केली : आरोगणा करवीली : मग : तीहीं विनविलें : जी जी : गोसावी ए नगरीं असति तवं एथें बीढार करावें : गोसावी मानिलें : मग : केतुलेया एकां दीसां मालें नवसीलें : जी जी : मज पुत होइल तरि मीं पाचां सहस्रांची पूजा

गोसावीयासि करीन : ऐसा तयाचीए स्त्रिएसि गर्भसंभुति जाली : त्या दोघांइ गोसावीयाची अधिक श्रधा जाली : आरोगण जालेयां विण तयाची स्त्री जेविना : मग गोसावी वीहरणी उसीरू न लवीति : मग : केतुलेयां एकां दीसां : बिजें करूं आदरिलें : तवं तेणें म्हणीतलें : जि जि : मज पूत होए तवं राहावें जी : मग पूत जालेयां नंतरें बीजें करूं आदरिलें : पुढतीं म्हणीतलें : जी जी : बारसें होए तवं राहावें जी : बारसें जालें : अनद्रान केलें : यानंतरें बीजें करूं आदरीलें : पुढतीं तेणें म्हणीतलें : जी जी : उष्टवनवरि राहावें : जी : उष्टवन जालेयां नंतरें पाटसूताचा जोगवटा केला : तेथ पांचां सहस्रांचीं रत्नें खेवणिलीं : मग मर्दना दीधली : पुजा केली : मग जोगवटा वोळगवीला : मग : तेंथौनि बीजें केलें : आउसें जोगवटा घालुनि बैसली होती तया उपरि म्हणीतलें : नाएका : यातेंही एकु जोगवटा होता : परि : तो पाटसुताचा : पांचा सहस्रांचा : हें काइ जी : पाचां सहस्राचां कैसा जोगवटा जी : मग हे लीळा सांघीतली : तो काइ केला जी : तो एका ब्राम्हणासि दीधला : हें काइ जी : ऐसा जोगवटा कैसेनि देवों सकीनलें : जी : नाएका तुम्ही असतीति तरि तुम्हां दीजता ॥ १५ ॥

वीराही स्विकारु : ॥ गावीं एकी वृक्षा खालि आसन : तवं हेडाउ उतरले होते : ते गोसावीयांपासि आले : तेहीं गोसावीयातें राजकूमरां ऐसें देखीलें : मग तेहीं : घोडेयाचीया जाती पुसीलिया : गोसावी घोडे जाती निरूपीती : जाति सुवास रोवें पाहातचि असे : मग हेडाउइं म्हणीतलें : वीनवीलें : आपुलेया दुसा घेउनि आले : मग मर्दना जाली : मादनें केली : गोसावीयासि

वखें वोळगवीलीं : घोडा दीधला : गोसावी मुख्य नाएकु : एर आवघे सेवक : ऐसें वर्तो लागले : मग : वोरंगळा बीजें केलें : हेडाउ आले आइकौनि लोकू साउमा आला : घोडे वीकीता : घोडे वीजाति जीवन बोलति : हा घोडा अमुकीये जातीचा : अमूका गुण : अमुकें लक्षण : हा घोडा अमूकेंचि लाहे : हेडाउ म्हणति : हा घोडा गोसावीयाचेनि बहुत मोल पावला : लोकु म्हणे : हा घोडा गोसावीयाचेनि सवंग आला : तेथ एकू वेव्हारा आला : तेणें देखीलें : मग : म्हणीतलें : जी जी : मातें कन्या-रत्न एक असे : तीचेया रूपा अनुरूप वरू कव्हणें ठाइं नाहीं : तर तीतें गोसावी आपुली दासी करि तरि तेणें मी कृत्याकृत्यू होए : माझेया केलेया फळ होए : सर्वज्ञें म्हणीतलें : एथ जाति कुळ नाहीं : खुंट दावें नाहीं : तेणें म्हणीतलें : जी जी : गोसा-वीचि जातिकुळ : गोसावीचि खुंट दावें : सर्वज्ञें म्हणीतलें : यातें करावेया नाही : तेणें म्हणीतलें : जी जी : मातें अवघीचि आ-इत असे : तव हेडाउवीं म्हणीतलें : हें अवघें गोसावीयाचेंचि नव्हे : मग : तो वेव्हारा गोसावीयांतें गोत्रांकुटुंबातें दाखवावेया घेउनि गेला : गोधोळीचें लग्न जालें : च्यान्ही दीस वऱ्हाडीकेचें जालें : मग हेडाउइं पाठवणीं मागीतली : हेडाउ नीगाले : मग केतुलें एक दीस तेथ राज्य केलें : एकदिनी : उपरीएवरि सारी खेळत असति : दुसरी वासना : आसनि बैसले असति : तीयें आउसें वारा घालितें असति : तवं अवधूत एकू नगरामध्यें भिक्षेसि रीगाला : संसारेसी पाठिमोरा जाला : ऐसा देखीला : तो देखौनि ऐसें म्हणीतलें : आतां एथौनि ऐसीयां होइजैल :

तवं तीयें आउसें मूर्च्छापरिपूर्ण होउनि पडीली : गोसावी उपंगळीए घेउनि उठविली : श्रीकरें डोळें पूसीलें : नेत्र प्रमार्जीले : सावधें केली : मग : म्हणीतलें : एथौनि तुमतें झांकवीजत होतें हांसीजत होतें : तेथ महदाइसीं पूसिलें : हांजी : गोसावी बीजें केलें : तरि तीयें काइ जी : तीयें यातें देखतें असति : स्तीति संचरली : आनंद जाला : मग बीजें केलें ॥ १६ ॥

डांकरामीं पाणीपात्र करूनि पहुडावेया **भिवेश्वराचेया** देउळा बीजें करीत होते : तवं लोकें वारिलें : देव व्हो : एथ न वचा : न वचा : एथ वाघु असे : गोसावी आइकौनि बीजें केलें : तवं तेथ वाघु आला होता : तेणें हाक दीधली : गोसावी सींहनादु केला : मग : तो वाघु पळाला : वाघु तेथौनि गेला : गोसावी तेथ पहुडले : उदेयाचि लोकु तेथ आला : तुरें वाजवीत : काहाळा : सींहनादु देति : परि वाघु निगेना : प्रत्येहीं ते ऐसेंचि करीति : मग : वाघु जाए : ते देवासि पूजा करिती : तै न निगेचि : तीहीं म्हणीतलें : आजि वाघु आझूइं कां नीगेना : तवं एकी म्हणीतलें : कालि वारीत वारीतां माणुस एक एथ आलें होतें : मग : तेहीं दुरौनि पाहीलें : तवं चौकीं गोसावीयातें देखीलें : जी : जी : एथ वाघु आला होता कीं : सर्वज्ञें म्हणीतलें : आला होता : तेणें हांक दीधली : एथौनि सींहनादु केला : तो गेला : आद्यप्रभृतीं तो एथ न ये हो : मग : सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : तीये दीउनि स्थान वसतें जालें ॥१७॥

गावीं एकी हाटामध्यें बीजें केलें : तिळ तेलीण तिळ पाखडीत होती : एकीवासना : तेल वीकीत होती : तीया देखीलें

मगः तियां म्हणीतलें : आगाए बरवीया जोगीया यईंजावों माझेयां घरा : ऐसें म्हणौनि : श्रीकरीं धरूनि घरा घेउनि गेली : एकी वासना आगाए बरवेया देवा ॥ पालवीं धरूनि घरा ॥ मग तेथं दोन्ही दारसंका धरूनि : सर्वज्ञें म्हणीतलें : आगा ए मेहरा : तुझीया मेहरी : यातें काइसेया आणीलें : तो घाणां खेढीत होता : तेणें म्हणीतलें : जी : जी : मी तीळमारा तेली : जी जी : माझेया पापा क्षेवो करावेया आणिलें जी : ऐसें म्हणौनि घाणीयां खालुती उडी घातली : बाजेवरि पासवडी आंथुरिली तेथ आसन : तो पासीं बैसला : तें उपहाराची आइत करीतें होती : मग तीयां दोघां विद्यास्तीति जाली : गोसावी बीजें केलें : तीयें अद्यापि देवोदेवी होउनि वर्तते असति : हें तियां बाटा : तेणें ठायें आलें : परि तीयें यातें ओळखीतिचि ना ॥ १८ ॥

बीडीं दक्षिणेश्वराकडे बीजें केलें : पासी पद्मनाभीदेव असति : तीयां बाटां सारस्वत भट आडपालों वोडौनि गेलें : तवं बाईसीं म्हणीतलें : बाबा : पैल सारस्वत भट नव्हति : सर्वज्ञें म्हणीतलें : होति : हे बाबातें देखौनि आडवे ओडवे की जात असति : सर्वज्ञें म्हणीतलें : पद्मनाभि तें हा एथु असे : म्हणौनि : तव बाईसीं म्हणीतलें : हा बाबा हा एथ असे : तरि यासि आडवेया जावेया कारण काइ : या उपरि सर्वज्ञें म्हणीतलें : सीष्याभिमानु म्हेळीयाचा ॥ गोसावी पंचकोळाचार्याची गोष्टि सांघीतली :

गावीं एकी व्यवहारेया एकाचेया घरा पाणीपात्रा बीजें केलें : तवं तेयां पुत्रासि ग्रहो लागला असे : अति सौंदरू : तो साखळीं खांबीं आळिला असे : तेल वोतीलें असे : तयातें धाडावेया

गुणीये एति : तो ग्रहो ह्मणे : एणें मंत्रें मातें धाडीसी : ऐसें : ह्मणौनि : मंत्र उच्चारी : ऐणें वोखदें मातें धाडीसी : ऐसें ह्मणौनि वोखदाचें नांव घे : तो काइसेनहीं न वचे : मग : तो ग्रहो कवणेंसीं बोलेनां : ऐसां तेथ गोसावी पाणीपात्रा बीजें केलें : पुढां पऱ्हीवा होता : ह्मणौनि : मागौतें बीजें केल : तेथ न वचतिचि : तेणें ग्रहें गोसावीयां देखीलें आणि ह्मणों लागला : हां गा : मातें सोडा कां गा : एया गोसावीयां पासीं जावों दया कां गा : मीं तुमचेया पुत्रातें सोडीन : आणि : मीं या ग्रहत्वापासौनि मुंचैन : तेहीं ह्मणीतलें : हा इतुले दीसू बोलेना : आतां बोलिला तरि सोडा : आह्मां इतुकेयां असतां के जाइल : मग : सोडीला : तवं गोसावी नदीसी बीजें केलें : श्रीचरणें सीळातळावरि उदक घातलें : तीये सीळेवरि अन्न घातलें : आरोगण करीत असति : तवं ग्रहो आला : मागीलीकडे बैसला : मग : म्हणीतलें : जी जी : मज प्रसादु दीयावा जी : उचिष्ठ गोसावी प्रसादु देती तरि माझेया पापासि निकृति होइल : सर्वज्ञें म्हणीतलें : तूं कवणू : जी जी तें गोसावी जाणत असति कीं : सर्वज्ञें म्हणीतलें : एहीं अवघां जाणावें कीं : मग : तेणें सांघीतलें : मी ग्रहो जी : जी जी : मी पूर्वी पंचकौळाचार्या : माझा शीष्य आणिका एका अवधुता पासी गेला : तेणें अभिमानें मिया तेयासि विषप्रळयो केला : तया पापातवं मीं ग्रहो जाला : सर्वज्ञें म्हणीतलें : एथीचिये दृष्टी समोर ग्रहो उभा न ऱ्हायेकीं : तव तेणें म्हणीतलें : जी जी : मीं अन्नघेयामध्ये ग्रहोसी मुख्य नाएकू : तो मी : मग गोसावी तेयासि प्रसादु आरोगण स्थानीं सांडीला : गोसावी परतें

बीजें केलें : तेणें अवघें सीतेंसीते वेचुनि खादलें : सर्वज्ञें म्हणीतलें यातें धरा : एऱ्हवीं पडैल : मग तो ग्रहो तेयाचिए देहींहुनि गेला ॥ ७॥ रामे : तेंहीं गोसावीयातें आवारासी नेले : मर्दना मादनें पुजा केली : आरोगणा जाली : मग तेथौनि बीजें केलें : मग : आउसीं ह्मणीतलें : बटीका तरि तुं न एसि एथें ॥ १९ ॥

गोसवीयासि **घोडाचुडांचे** सिप्य भेटले : तेहीं ह्मणीतलें : देव हो : चाला जावों **खीखींद** पर्वतासि : तेथ घोडाचुडी असति : गोसावी मानिलें : गोसावी आधीं पाणीपात्र करीति : पाठीं ते चाटणीं करीति : सांघातें असत्ति : आणि ते चाटणीं करीत होते : एकी बाइया कढती कढती आंबील हातीं घातली : तेहीं आंबील चाटीली : हातु वळनीये पुसीलें : आणि आगी लागली : गावों जळों लागला : तें : पुरुषु : मागील वास पाहाति : हांसति : ऐसे गोसावीयांपासि आले : गोसावी पूसीलें : तेहीं अवघें वृत्तांत सांघीतलें : मग : सर्वज्ञें ह्मणीतलें : माहात्मे हो वोखटे केलें : ऐसेनी भूतहींसा केली : जाली : परि कैसीही काहीं घ्रूणा नुपजेचि होए : आता हे तुम्हा सांघातें नये : मग गोसावी तीं अहोरात्रें परमेश्वरपुरा आले : बीजें केलें ॥ २० ॥

दोहीं पीवळ तळौलियां मध्यें **श्रीप्रभुभेटी** होए : पाहारू दोनि कांतीये एकितळि बैसले असति : मग : श्रीप्रभु रीधपुरा बीजें करीति : मार्गीं मातांगु एकू : हूरडा सोले : उंसाचीया कांडीया : दोने भरूनि ठेवी : वरि पांतळी झांकी : श्रीप्रभु बीजें करीति : तेथ अडुखळति : इ काइ रे : मेला जाए : ह्मणौनि : तेथचि बैसति : कणु कणु आरोगीलें : मग : बीजें

केलें : तो प्रसादु आमुचे गोसावी घेति : मातांगु दुरौनि दोहीं गोसावीयांसि दंडवत घाली : मग श्रीप्रभुची श्रीमूर्ति दीसे तवं आमुचे गोसावी अलोकीत उभे असति : मग : दाभविहीरी बीजें करीति : तेथ पाणिपात्र करीति : आरोगण होए : भैरवी पहुड : प्रतिदीनी श्रीप्रभुचेया दर्शना जाति : दीसवीस अनुमान अवस्थान : एकदिनी रूपनाएका दर्शन जालें : आपुलीया गावां घोडेया वाउनि घेउनि गेला : मर्द्दना जाली : मादनें जाली : पुजा केली : सर्वज्ञें भणीतलें : तो आगमीक पुजा करू निका जाणे : तेथ वसति जाली : आरोगणा जाली मग : तेथौनि बीजें केलें ॥२१॥

वींझी भक्तजनें : भिक्षे गेली होती : भुतानंदाचीए लेकीचीया घरा : तेथें भूतानंदाचीया नाती : चींचुकरटां तांदुळ रांधीलें : ते : गोसावीया पुढां सांघीतलें : जी जी : तांदुळ सीजलें : जी जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : आति : बाइ : हे वींझामध्यें गोंडाआंतु होते : तया गोसावीयांची प्रीति संचरीली : गोसावीयातें न देखति : आणि देवणे करीतें आळवीति : कीळु कीळु करीतें नाचति : श्रीचरणीं तळवा : तळहातीं : उदरीं : मोमे देति : मग वेळुवाचें कांडोरें कोरीति : तेथ तांदुळ घालीति : डांबीर देति : घालीति : सेणें मातीया बोबुनि आगींमध्यें घालीति : तें होतें पदन तीयेंचि जाणति : मग : पायाळें चीरीति : मग : तो भातु पातळीये नीवतु घालीति : पातळी पोमिनिचीया पानाची : एकी दोणां आधाचा मधु घालति : एकू दोना पानीयाचा ठेवीति : पाणीयाची सीर तीयेंचि जाणति : ऐसें उकरीति : आणि पानी

लागे : ऐसी आरोगण देति : मग : केतुलेया एका काळा बीजें केलें : ॥ २२ ॥

गावीं एकी व्रक्षाखालि आसन : तव पारधी वाटे ससा सोडीला : तेया पाठीं सुणी सोडीली : काकूळती येउनि ससा जानूतळि रीगाला : सूणी उभी राहीली : मागील कडौनि पारधी आले : तेहीं वीनवीलें : ससा सोडीजो जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : हा एथ सरण आला : पुडती तीहीं ह्मणीतलें : जी जी : हा ह्रोडेचा ससा जी : या कारणें सूरीया काढणीया होती : जी जी : हा सोडावा : जी : एकी वासना : काल लागैल जी : ससा सोडीजो जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : **हां गा : एथ सरण आलेया काइ मरण असे :** जी जी : तरि हा : गोसावी राखीला ॥ रामेश्वरबास ॥ निरूपण केलें : हां गा : ए रानीं असति : पाणी पीति : यातें तुम्ही कां मारा : तीहीं ह्मणीतलें : जी जी : आजि लागौनि न मरूं : मग : तें निघाले : मग : सर्वज्ञें ह्मणीतलें : माहात्मे हो : आतां जाए ऐसें : भणौनि : जानु उचलिली : मग ससा निगाला ॥२३॥

सेंदुरणी नारायणाचां देउळी मासोपवासीनी असति : तेथ बीजें केलें : दोन्ही दारसंका धरूनि भीतरि अवलोकीलें : मग : साजां आसन : एकी मासोपवासीनी श्रीमूखीचें तांबोळ मागीतलें : गोसावी श्रीकरें लोकांकडे दाखवीलें : त्या ह्मणीतलें द्यावें जी : लोकाचें काइ : मग दीधलें : तीएसि स्तीति जाली : तिसि बारावरीखें आनोदकें नाहीति आपणपें कांहीं जाणे ना : तीचे बाप भाऊ : वायू तथा वारा ह्मणौनि वोखदें करीति : बारा

वरीखां : त्या : ह्मणीतलें : पुरुष : होतिल : तरि देह वाचैल : तेहीं पुसीलें : कैसें पुरुष असति : तया पुढां सांघीतलीया खुणा : ते आतांचि नीगाले : मग : ते पाहों लागले : गोसावी तींएचि प्रदेशीं भेटले : तीहीं ह्मणीतलें : गोसावीयासि आवारी से घेउनि गेले : तेथ बीजें केलें : तीया गोसावीया देखीलें : श्री चरणा लागली : आणि : स्तीति सूभर जाली : मागुतीं गोसावी तेथौनि बीजें केलें ॥२४॥

लखुदेवोबा गोदार्ना कटका गेले : ते करजाळेया आले : तेहीं सामकोसांतें पुसीलें : नागदेवो के गेला : वो : तेहीं ह्मणीतलें : गोसावीयांपासीं असे : गोसावी कोण : सामकोसीं ह्मणीतलें श्रीचांगदेओ राउळ : गोसावी हीवरळीये असति : आणि अंतःकरण वेधलें : तैसेंचि निगालें : अहोरात्रें आले : श्रीमूर्तिचे सारिखें पुढां देखति : मढाचां दारवठां पातले : तवं भट बाहीरि निगतां भेटले : भटीं म्हणीतलें : आलासि तें निकें केलें हो : मग : भटीं दर्शनें आणु पाठवीलीं : दर्शन घेउनि आले : दंडवतें घातलीं : आणि : स्थीति भंगली : दर्सन आणिलें तें आवघें बीखूरलें : तें भटीं आसनापासि ठेविलें : मग गोसावी पुसीलें : तुम्हांसि एथचें दर्शन आति : तेंहीं ह्मणींतलें नाहीं : जी : तरि श्रवण आति : जी : जी : मग तीहीं मागील पूर्वी सांघीतली : (रामेश्वरबास) ॥ छ ॥ हें दृष्ट कीं श्रुत ॥ मग सर्वज्ञें ह्मणीतलें : ऐसी एकें सुक्षेत्रें असति : भुमीं बीयां मेळापकू कीजे : आणि भारू आथौनि पीकति : एकी वासना : घुमरींसीं उठीति : एकें नांगरवेऱ्हीं उलखीजति : घाटे वापे

पेरीजति : परि तेथें बींहीं न निगे ॥ २५ ॥

मागां हें (श्रीचक्रधर) रामीं (रामटेक) होतें : हें जया वोटेया वरि होतें तया वोटेयासी बडुवा धुपार्ति करी : तया वोटेया वरि ब्राह्मणु येकू बैसला : तेयासि स्तीति जाली : तेणें वोटेयासि धुपार्ति करितां देखीलें : मग : बडुवातें पुसीलें : तुम्ही धुपार्ति कवणासि करीत असा : तेणें ह्मणीतलें : एथ एकु पुरुष होते : तेयासि करूं : मग : भोगरारामांसि करूं : ते पुरुषू निगाले : मग तेयाचीया वोटयासि करूं : ते केउते गेले : तेणें ह्मणीतलें : मनसीळेसि गेले : मग तो ब्राह्मण मनसीळेसि आला : दर्शन जालें : मग : त्या स्थीति सूभर जाली : सर्वज्ञें ह्मणीतलें : **ऐसें हें एथचेया नामातवं होए : कां स्थानातवं** होए ॥२६॥

भांडारां भांडारेकाराचेया घरां पाणीपात्रां बीजें केलें : तव ते उतरा संग वस्त्र धोत्र घालुनि पोथी वाचीत होते तयासि स्नानां लागौनि : पाणी सारिलें होतें : पाणिपात्र जालें : परि गोसावीयांचि वास न पाहाति : मग : सर्वज्ञें भांडारेकारा ह्मणीतलें : भटो : मागिल फांकि (पान) ह्मणा : मग गोसावी बीजें केलें : पाठीं तेही नीगाले : तवं घरीचां ह्मणीतलें : तुह्मी कें निगालेति : तुह्मां पाणीं सारिलें असे : मग : भांडारेकारी ह्मणीतलें : हें इतले दीस तुह्मापासीं होतें आतां जेयाचें तेयापासि जात असे : तुह्मी राहा : सर्वज्ञें ह्मणीतलें : अज्ञाधरें : मग : तीयें राहीलीं : गोसावी तळां : श्रीचरणें शिळातळापरि उदक घातलें : श्रीकरिचें अन्न तेथ ठेविलें : मग : आरोगणीं भांडारेकारा प्रसादु जाला :

मग : परतें ऐसें वृक्षातळीं बीजें केलें : भांडारेकारी अरुतें धोत्र फाळुनि आसन केलें : गोसावी नावेक आसनीं बैसलें : मग तेथौनि बीजें केलें ॥ २७ ॥

एक वेळ **भांडारेकार** वीगुळी (इंगळी) चावीले : असाह्य पीडा हों लागली : मग ह्मणीतलें : जी जी : मी स्तुति करूं : सर्वज्ञें ह्मणीतलें : करा : मग स्तुति करूं लागले : जवं जवं स्तुति करीति तवं तवं व्यथा काढली : ऐसी स्तुति करीतां अ-चषी व्येथा काढली ॥ २८ ॥

बेलोपुरीं भटोबासातें ह्मणीतलें : वानरेया : तुह्मांसि करणीये एकू असेगा : भटीं ह्मणीतलें : जी जी : सर्वज्ञें ह्मणीतलें परी तें द्रव्यसाध्य : तव भटीं ह्मणीतलें जी जी : गोसावी जाणत असति कीं : मातें द्रव्य नाहीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : **तुं उभा ठाक-लाचि पुरे** : **सीधीतें ऐथौनिचि** नेइजैल कीं : **पुरुषु आपुलें करणीयें म्हणौनि प्रवर्ते : तयासि द्रव्याचीं सतें मीळति** : मग भांडारेकाराची गोष्ट सांघीतली ॥ २९ ॥

एथ भांडारेकार होते : तयासि करणीयें वीहीलें : तें एथौनिचि सीधी नेलें : **अळजपुरी भैरवी** अवस्थान :॥ भांडा-रेकारा **निर्वाणेचेया** : देउळा पाठवीलें : कव्हणी कांही म्हणैल : तेथ जाइजे हो : मग : भांडारेकार **निर्वाणेचेया** देउळा मागें बैसले : **पंचोळीची स्त्री** धानाबाई : तीसि : निर्वानेची भक्ति : ते प्रदक्षणे आली : तवं भांडारेकारातें देखीलें तेयांसि नमस्कारू केला : आवारा घेउनि गेली : पुजा करूं आदरीली : तवं तेहीं ह्मणीतलें : हे काइ कराल : तीयां ह्मणीतलें पुजा करुनि : मग

तेहीं ह्मणीतलें पुजा तरि आमुचेया गोसावीयासि करा : तीया ह्मणीतलें : तुम्हांइं आणि गोसावी असति : तयातें बोलाऊं पाठवीन : दांडी डोळेकार पाठवीन : तेही ह्मणीतलें : ना : आम्हीचि बोलाउनि : मग : भांडारेकारीं आवघें वृतांत सांघीतलें : जी जी : तरि तेथ बीजें करावें : गोसावी तेथ बीजें केलें : त्या गोसावीयासि देखीलें : आणि : भांडारेकाराचेया पासि उचें बरवीं पुजाद्रव्यें आणौनि पुजा करूं आदरीली : तवं सर्वज्ञें भणीतलें : तुम्ही यांचा हातीं वोपा : हे एथ पुजा करीति : हें याचें कीं : मग : तीयें : भांडारेकाराचीए हातीं देति : ते गोसावीयासि पुजा करीति : मग : भांडारेकाराचीं पुजाद्रव्यें तींहीं आणिलीं : पूजा केली : तें तेयाची तयासि देवों आदरीली : तीहीं ह्मणीतलें : जी जी : ईश्वरीं अर्पीलें तें माघौतें कैसें घेयावें : सर्वज्ञें ह्मणीतलें : एथौनि तुम्हा देइजत असीजे : तेहीं मानीलें : मग त्यें परित्यजुनि बीजें केलें : मग : सर्वज्ञें ह्मणीतलें : भटो : तुमचें करणीयें चरितार्थ हो ॥ तेथ ह्माइंभटीं ह्मणीतलें : जी जी : मज वीहीजो : मातें द्रव्य असे : तुह्मांसि आणिक करणीयें : यांसि आणिक करणीयें : ह्या संनिधान पातला असे : तुम्हां संनिधान करावें असे ॥३०॥

नांदेडीं भावतीर्थीं नरसींहीं अवस्थान : ॥ भांडारेकार भिक्षेसि गेले : तवं पडिसाळे लेंकरूवें पढतें होतीं : भांडारेकारीं म्हणीतलें : आरे : परते परते सरा : पडीसाळ पडली : पडली : तीयें आवघीं बाहीरि नीगालीं : आणि : पडीसाळ रिचवली : तें आश्चर्यें लोकासि जालें : सोपस्कार मीक्षा देति : भीक्षा घेउनि

आलें : मग : गोसावीया पुढा : तेहीं मागील वृत्तांत सांघीतलें : मग : सर्वज्ञें ह्मणीतलें : हां गा : ऐसेसीं करींता लोकु न भजो : ऐसें न कीजें कीं तेहीं ह्मणीतलें : जी जी : मज ऐसें न व्हावें : सर्वज्ञें ह्मणीतलें ऐसें न करा तर नव्हे ॥३१॥

नृसींही भांडारेकारासि असक्ति उपनली : तें भोगस्थान ह्मणौनि पैलाडी नंदेश्वरा बीजें केलें : मांडी उसीसेया दीधली : एकी वासना : सर्वज्ञें ह्मणीतलें : भटो काळवंचना करूं : तीहीं ह्मणीतलें : ना : जी : मग : मांडी उसीसें करूनि : श्रीमुख अवलोकीत देह त्येजीलें : मग : गोसावी तेयांसि जळनिक्षेपु करवीला सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : मग यासि तेथ राहावेंचि ना : मग : हें तेथौनि निगालें ॥३२॥

गोसावी गावां एका बीजें करीत असति : तवं : राणीं गोपाळ खेळत असति : सर्वज्ञें ह्मणीतलें : गोपाळ व्हो : हें तुम्हांतु खेळों येईल : तिहीं ह्मणीतलें : हो कां जी : रानेभेरियाचा खेळु : गोसांवीयां खेळतां : जीयावरि दाही ये तेयाचिए पाठीवरि अरुहण करीति : ते सीमां पुरे : परि : तो पाठी वरूनि उतरवीना : एर ह्मणिएति : कारे उतरिसि ना : तो ह्मणे : सूख होत असे रे : तवं एरू ह्मणे : पा पां : जी : माझीये पाठीवरि बैसा : तवं तेयांहीं तैसेंचि सूख होए : तवं तो ह्मणे : आरे : तुज काइसें सूख : सूख जें मज होत असें : तवं आणिकु ह्मणे : पा पां : जी : माझीये पाठीवरि बैसा : यापरि आवघीयाचीए पाठीवरि अरुहण केलें : जेयाचीए पाठिवरि अरुहण करीति : तयासि सूख होए : मग : खेळु पारूखला : मग मोटा सोडीलीया : काला केला : गोसावीयासि

आरोगणा मग उसीरू जाला : जेया गावां बीजें करीत होते : तेया न वचतीचि : आणिकू आडवा गांवो होता : तेथ बीजें केलें : मागीली कडौनि एकू संन्यासी आला : तेहीं गोपाळातें सूख अनुमोदीतां आइकीलें : कैसा गा देओ : कैसें आह्मांसि सूख दीधलें : संन्यासी ह्मणीतलें : गोपाळ हें सूख काइ जाणती : पूसीलें : हारे गोपाळ ह्लो : तुम्ही काइ बोलत असा : तेहीं ह्मणीतलें देवो एकू आम्हांतु खेळो आला : तो जेयाचिए पाठीवरि सेबै तेयासि सूख होए : ऐसें अवघेयासि सूख दीधलें : तेहीं ह्मणीतलें हारे ते पुरुषु केउतें गेलें : ते पैलेगावां नीगाले : मग ते संन्यासी गोसावीयापासि आले : तयासि स्थिति जाली : ते अद्यापि द्रावडदेसीं आचार्ये होउनि वर्तत असति ॥३३॥

गावीं एकीं वीहीरीसि आसन : तेथ : गोपाळ आले : एरूए आपूलीया वाहाणा फेडि : पांगुरण ठेवी : उदकामध्यें रिगे : तो अदृश्य होए : आणिकू ए : तोही अदृश्य होए : ऐसे आवघे अदृश्य जाले : गोरूवें आपणालेया गेली : गावींची माणुसें आलीं : तवं तेहीं गोपाळाचया पांगुरणाचे पुजे देखीले : मग : तेहीं पुसीलें : हा जी एथ गोपाळ होते कीं : सर्वज्ञें भणीतलें : एथ असति : आपुलालेयाचीं नांवें घेउनि बोलावा : मग ते नावें घेवोंघेवों बोलावीति : सांगेया म्हणति : आणि तो उदकांतुनि निगे : आपलें पांगुरण घे : वाहाणा ले : मग : जाय : आणिकातें बोलावीति : तेही तैसेंचि नीगति : लपवीले होते ते आवघेही निगाले : तेथ : महदाइसीं पूसीलें : हा जी : तें कें होते : सर्वज्ञें ह्मणीतलें : अवगळा एकी धरिले होते ॥३४॥

एकी गावीं म्हातारी एकीचा पुत गोरूवे राखे : तेनेंसी गोसावीयासि पाड्ड प्रज्ञान आति : तीए गावीं गोसावीयासि वृक्षा खालि आसन : ऐसां तेयासि जरू आला : तयाचीया माता म्हणीतलें : जी जी : तेयासि जरू आला : आतां गोरूचें आणिकासि नीरोवीति : आम्ही मेलों : गोसावी तेयाचीया घरा बीजें केलें : तेयाचें पांगरूनि तेया सरिसा पहुड : तेयासि समाधान जालें : तो गोरूवासरिया पाठवीला : तेयाची माए गोसावीयासि पथ्य करी : केतुलेया एका दीसा : गोसावी समाधान स्वीकरीलें मग : त्यें : गोसावीया नीगों नेंदीति : सर्वज्ञें : म्हणीतलें : हें तयासि भांडौनि निगालें : हे गोष्टि भुतानंदाप्रति सांघितली ॥३५॥

दोही गावामध्ये वृक्षातळि आसन : खीरारी एकु दाटुनि सीवारू चारी तयासि गांवीचे लांचु देति : मग : तो गोरूवें परतीं तैसेंचि तीए गावी सीवारू चारूं लागला : बोंब जाली : धावणें निगालें : गोसावी ही बीजें केलें : गोसावी तळुसुति केली : सर्वज्ञे ह्मणीतलें : हें जैसें तेयाचें आठावेठीचें पाइक : ऐसें हें पुढां पुढां वाढीनलें : एकी वासना : खीरारीया भांडण जालें : वारितां खीरारी धरेना : आणि गोसावी चडकणा हानौणि तेयाचा डोळा खालि पाडीला : आणि : कळि समली : मग : श्रीकरीं डोळा घेउनि लावीला : श्रीमुखीचेया तांबूळाची पींड बांधली : डोळा निका जाला : मग तेथौनि बीजें केलें ॥३६॥

नाथोबा घोगरगावा भिक्षे जाति तो उसीरू लागला : मग गोसावी पुसीलें : मंडळीका उसीरू का लावीला : तेहीं ह्मणीतलें : जी जी : एकी पुसे : देव व्हो तुम्हांसि देवी कां न

करा : देवीवीण गमे कैसें : सर्वज्ञें ह्मणीतलें : पोरा : तयाचा घरा कां जासि : जी जी : पाठीं इतुला ऐसा भातु घाली : सर्वज्ञें ह्मणीतलें : तेया गांवा न वचावें : मग काळावीबीरवणेयाची गोष्टि सांघीतली : ॥ छ ॥ गावीं एके पाणीपात्रासि बीजें केलें : एकि बाइ : गोसावीयातें देखौनि ह्मणे : बटकीतें पुस गे : देवासि काइ देवी असे : तेवीचि कळावीबीरवी पुडती पुडती ह्मणे : पुस गे : देवासि काइ देवी असे : सर्वज्ञें ह्मणीतलें : **प्राणियांसि यातेंहीं देखौनि विकारूं भोगूं आवडे ॥३७॥** :

सांघातधर्मा उपरि गोष्टि सांघीतली : गावी एकी पहुडावेया बीजें केलें : चिपडी ऐसी पडली असे : तीये गावीचिया अधीकार्याची घोडी चोरीं काढीली : एकू चोरू खोडां घातला असे : तराळु आपुलें पुरावें सोधीत असति : तीहीं गोसावीयातें देखीलें : पैलु कोणु कोणु : म्हणौनि : साउमे आले : गोसावी उगेचि : मग ते गोसावीयातें धरूनि घेउनि गेले : अधीकार्या पुढें सांघीतलें : चोरू एकू धरिला असे : तेनें ह्मणीतलें : जतन करा : तेहीं चोरू खोडां घातला होता : तेथ आणीलें : खोडां श्रीचरणु घालवीला : खीळि आदळितां हातु वरताचि ठाके : एरू म्हणे : कां खीळि आदळीसिना : तो म्हणे हातु खालुता नैए : मा मा : म्हणौनि : येरू घे : त्याही तैसेंचि होए : ऐसें अवघेयाचें हात वरतेचि ठाकति : खालुते न येति : मग तेहीं अधीकार्यापुढें सांघीतलें : मागाचा चोरू खोडां घालीत होतों : तवं खीळि आदळितां मोगरिचा हातु खालुता नए : वरिचा वरि हातु असे : मग : तो अधीकार्या कळदीवी लाउनि तेथ आला :

तेणें म्हणीतलें : गोसावीयातें एथें कोणें आणिलें : रे : फेडीजो जी श्रीचरणु : गोसावी उगेचि : पुडती तेणें म्हणीतलें : गोसावी उगेचि : पुढती तेणें म्हणीतलें : श्रीचरणु फेडीजो जी : सर्वज्ञें म्हणीतलें : आधीं सांगाती : तेणें म्हणीतलें : फेडागा सांगातीयाची खीळि : मग : गोसावीयासि आवारासि बीजें करावया म्हणीतलें : आधीं सांगाती : मग गोसावीयासि मर्दना मादनें : सांगाती उटीला न्हाणिला : गोसावीयासि आरोगणा : सांगातीया जेवण जालें : गोसावी पहुड सांगाती नीजैला : मग : सांगातीयें म्हणीतलें : जी जी मीया अन्यावो केला : असे : थोरू : हे मातें न रखती तरि मी जावों : गोसावी आनोज्ञा दीधली : तो निगाला : उदियाचि गोसावीयापासि तो अधीकार्या आला : तेणें म्हणीतलें : सांगाती काइ गोसावी पळवीला ॥३८॥

वेठी गमन ॥ गोसावी गावी एकी पडवीए : पहुड : काबाडीया मध्यें उदीयांचि मोलकैयें तीयें वेठी धरूनि नेली : तेया सरिसें : गोसावीयांतेंहीं नेलें : अवघेयांहीं सेती पांठा चिरीलिया : एकी पांठ गोसावीयाहीं चिरीली : अवघेयांचीया पांठा चालति : गोसावीयांची पांठ चालेना : गोसावी श्रीकरीं गहुवाचिया काडीया दोणि घेउनि निश्चळ बैसले असति : पैल पांठ चालेना तें काइ : एरीं म्हणीतलें : नेणों : हा मागां लागौनि निवांतु बैसला असे : कांही पांठ चालवीना : मग : तो अधीष्टाता साउमा आला : तेणें म्हणीतलें : गोसावीयासि कोणें रे आणिलें : मग : तेणें वीनवींलें : तेतुलेया सेतासि अन्न आलें : मग गोसावीयासि आरोगण दीधली : मग तेथौनि बीजें केलें : ॥ ३९ ॥

गांवीं एकी पाणिपात्रासि बीजें केलें : ब्राह्मणा एकाचेया घरासि : तेणें म्हणीतलें : कोण्हाचीं गोरूवें राखा कां : सर्वज्ञें ह्मणीतलें : यासी कव्हणी राखों नेदी : तेणें ह्मणीतलें : आम्हीं देउनि : आमचीं राखा : सर्वज्ञें ह्मणीतलें हें राखैल : परि दोहे ना सोडील परि बांधेना : तेणें ह्मणीतलें : आम्हीं बांधौनि : आम्हीं दोहौनि : मग गोसावी मानीलें : उदीयांचि तिये गोसावीयासि मोट घालीति : गोसावी गाइ सोडीति : राना चारावेया नेति : गोसावी मोटेचें अन्न आरोगण करीति : सुडा धुति : श्रीमुकुटावरि घालीति : सीळातळावरि बैसति : गाइ श्रीमूर्ति अवलोकीत बैसलिया असति आनंदु रोवतीति : वीळीचां गोसावीया गाइ घेउनि बीजें करीति : तीया गाइसि बहुत दुध होए : मग : तेणें ब्राह्मणें ह्मणीतल : आपुलियें ब्राम्हणीतें : पै : आजि दुध बहुत जालें : गाइ निकेया चारीलिया : यासि न्हावेया लोणीं घालावें : याचीये मोटें दहीं घालावें : यापरि निचाचेयापसि निच (नित्य) अधीक गाइसि दुध होए : मग : तो ब्राम्हणु राखों गेला : गाइ कव्हणा राना नेतु असे पा : तवं गोसावीयांसि एका सीळातळासि आसन : गाइ श्रीमूर्ति आनंदु रोंवतीति देखीलीया : वीळवेंन्ही चारूं नाहीं : पाणीं नाहीं : ऐसें देखोनि थोर वीस्मयो जाला : मग : घरीं ब्राम्हणीपुढां सांघों लागला : पै : आमचेया गाइ राखते तो साक्षात श्रीकृष्णू : मग : तेथीचें वृतांतु सांघीतलें : तीये दीसी गाइ गावामध्यें घातलीया : मग : बीजें केलें ॥ ४० ॥

भैरवी अवस्थान : दीस वीस : लोणारीं तारातीर्थीं

आसन : तेथ कान्हरदेवो आला होता : तेथ गुरूवें सांगीतलें : पुरुषु एकु भैरवी असति : तया उपरि त्यासि तारातीर्थी दर्सन जालें : हडुपातें वाखारी मागीतली : तीया आसूचें पुजा दर्सन केलें : कान्हरदया जवळीलीं म्हणीतलें : देवव्हो : घेया घेया : सींगुणाचा कान्हु प्रसन जाला : तवं तेणें ह्मणीतलें : सररे ऐसे काइ म्हणत असा रे : कान्हु तो तुम्हासी कीं : यांसि काइ कान्हु : मग तेणें दीठीचें राखण घातलें : मग तेथौनि गोसावी बीजें केलें : तेणें द्रव्यें कूमारेस्वराची पाळि केली ॥४१॥

गोसावी गावां एका बीजें करीत असति : तेथीचेनि लोकें वारिलें : देव व्हो : या वाटा न वचा : न वचा : एथें अरण म्हैसा असे : तो माणुसें मारी : आइकौनि बीजें केलें : ते मार्गी चालतां वाणी पडली आणि म्हैसा आला : गोसावी अवलोकीला : आणि : तेयाचा रोखु निवर्तला : बीजें केलें : तीयें दीठनि तो मार्ग वसता जाला ॥४२॥

एकू वेळ रानीं जाळीं एकी बीजें केलें होतें : तेथें लाहासिची पीलीं होतीं : ते पारधी गेली होती : तीयें पीलीं गोसावी खेळवीलीं : तवं ते आली : गोसावी अवलोकीली : रोखू नीवर्तला : मग : ते मोळी टेकौनि बैसली : सूनेयाचियापरी : मग : नावेक : गोसावी पीलीं खेळवीलीं : वडुवें धरूनि एरीकडीचां ऐरी कडी घातली : मग तीएचीं तीएकडे घालुनि मग गोसावी बीजें केलें ॥४३॥

ठाकूर एकू : तयासि पुत्र नाहीं : तेणें गोसावीयातें देखीलें : मग आपुलीया आवारासि घेऊनि गेला : गोसावियासि

मर्दना दीधली : मादनें जाली : पुजा केली : आरोगणा जाली : दंडवतें घातलीं : मग तेणें ठाकुरें म्हणीतलें : पुरुषाचें वीर्यें अमोघ : पुत्राचेया चाडा आपुली वडील स्त्री सेवा करावेया पाठवीली : नावेक ते सेवा करीत होती : मग : सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ निद्रा करा जा : मग ते गेली : तिया म्हणीतलें : गोसावीयासि प्रवृति नाहीं : तेणें म्हणीतलें ते वडील म्हणौनि नाहीं : मग धाकुटी भार्या पाठवीली : तियेसि गोसावी आंतु रिगों नेदीतिची : तेथौनिची पाठवीली : तीयाहीं सांघीतलें गोसावीयासि प्रवृति नाहीं : मग तेणें वीनवीलें : जी जी : मज पुत्र नाही : सर्वज्ञें म्हणीतलें : वडिले भार्येसीं वीहरण करा : मग होइल : मग बीजें केलें ॥४४॥

रायेरी अवस्थान असे : तीये गावीं वामनपैंधी ब्राह्मणु : तयाची भार्या निवर्तली : ते समसानां आणिली होती : तीये प्रदेसीं गोसावीयातें वामनपैंधीं देखीलें : श्रीचरणा लागला : मग गोसावीयातें वामनपैंधी म्हणीतलें : जी जी गोसावीयाची दासी नीमाली जी : गोसावीयासि पाणीपात्र दे जी : ऐसा शाब्दीं म्हणीतलें : वीनवणी स्वीकरीली : मग गोसावी तीये जवळि बीजें केलें : तीयेतें म्हणीतलें : बाइ एथ पाणी पात्र दीया : मग ते बाइ जीयाली : मग गोसावी तेनिथौ बीजें केलें : घरा तयाचीया तया बाइया पाणीपात्र आणिलें : सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ पाणीपा दीयाल तरि तें असे : मग ते उगीचि राहीली : वामनपैंधीं पाणीपात्र दीधलें : मग तेथौनि बीजें केलें ॥ ४५ ॥

गोसावीया राएरीं कीं नादीयेडां अवस्थान असे : वृक्षा

एकातळि आसन होए : गोवींद स्वामिसि गोसावीयांची श्रधा नाहीं : गोसावीयाचें दर्सन होइल म्हणौनि ते वाट सांडीली आणिकी वाटा जाति : एकुदीनीं वृक्षा आड आसन : गोसावी तेथ नसति म्हणौनि तया वृक्षावरौनि गोवींदस्वामि आले : दिठि दीठि मीनली : आणि स्थीति जाली : मग गोसावीयांसि आड पडीले : जी जी : मिं पापीया जी : गोसावीयांसि भुंके : ऐसां ऐसां शब्दीं तेहीं अनुताप केला : मग सर्वज्ञें म्हणीतलें : **विष्णूस्वामी** तुमतें पूसीती : हें तुम्हासि कवणा पासौनि : एथौनि सांघाल : तरि : हे तुम्हां दर्सन नेदी : **गोवींद स्वामीं** म्हणीतलें : हो कां जी : मग ते निश्चला बैसले असति : स्नान न करीति : देवपुजा न करीति : विष्णुस्वामिसि नमस्कारू न करीति : ऐसें कर्म कांहींचि न करीति : मग वीष्णुस्वामी म्हणीतलें : सापें हा गोवींदु नष्टु जाला : स्नान न करी : आम्हांसि नमस्कारू न करी : देवपूजा न करी : मग : वीष्णुस्वामी स्वप्नू देखीला : नरसींहु दंडवतें घालूं लागला : तेहीं गजबझौनि म्हणीतलें : हें काइ : हें काइ : तुम्हीं मज दंडवतें कैसी घालीतें असा : तवं नरसींहें म्हणीतलें : तुम्हीं आमचीं दंडवतें आपेक्षीत असा : म्हणौनि : घालीत असों : तीहीं म्हणीतलें तुमचीं दंडवतें मीं कैसी आपेक्षीत असें : तवं नरसींहें म्हणीतलें : गोवींदाचीं दंडवतें आपेक्षीलीं असति : तरि गोवींद तो मीं : ऐसें स्वप्न देखीलें : मग : चेत्रो आलेया उपरि : उदेयांसिचि गोवींदस्वामीसी दंडवतें घालूं लागले : तवं गोवींदस्वामीं म्हणीतलें : हे काइ हें काइ : तुम्ही मज दंडवतें कैसी घालीतें असा : तवं तेहीं म्हणीत-

लें : हें तुह्मां कोणापासौनि : हें सांघावें : तवं गोवींद स्वामीं ह्मणीतलें : हें तुह्माचि पासौनि : तवं तेहीं ह्मणीतलें : हें आ-ह्मांसिचि नाहीं : मग तुह्मांसि कैचें : विष्णुस्वामीं म्हणीतलें : आह्मां पुढां सांघा कां तुमचेनि आह्माहीं गोमटें होइल : मग तेहीं सांघीतलें : हें मज गोसावीया पासौनि जाले : मग : एर एर : गोसावीयांचेया दर्सना आले : गोसावी तेयांसि दर्शना नेदीतिचि ॥ ४६ ॥

भक्तीजनी पूसीलें : हां जी : विष्णूस्वामिसी येसणीं उपाधि काइसी : सर्वज्ञें म्हणीतलें : तेयातें **घुटिका सींधि** होति : घुटीका तोंडी घालीति : आणि : उत्पवन करीति : आपुलियां सीक्षाचिया ठाया जाति : कडवसां राहाति : तयाचें एकांतीचें बोलणें आइकति : एरी दीसीं तेयापुढें सांघति : तुं ब्राह्मणींसी ऐसा बोलीलासि : तुझी ब्राह्मणीं तुसीं ऐसी बोलीली : ऐसी खूण सांघति : एतुलेनि तयासि आश्चर्ये होए : हे सामान्य नव्हति : एणें तयांची श्रधा वाढीनली : मग : पर्वणी एकी आली : लोकांसी आश्चर्यें दाखवावें म्हणौनि घुटीका तोंडी घालुनि उत्पवन केलें : तवं सींक आली : तवं घुटीका तोंडीची पडीली : पोरू पाणीयांतु पडिला : म्हणौनि : पावो मोडला : सोधु : यन्हवीं थडीए पडतां : तरि हाडगुड नुरतें : मरता ॥४७॥

गावीं एकीं सेवंतिये वऱ्हाड राहीलें असे : तयांतु : गोसावी बीजें केलें : बैसले : गांवींचे वऱ्हाडी तेया साउमे आलें : वाजत गाजत घेउनि गेले : मांडवीं वरिलाकडे बैसों घातलें : खालिलीकडे : येर वऱ्हाडी बैसले : आधीं गोसावीयांसि चरण

क्षाळण केलें : पाठीं यरा वऱ्हाडीयांसि तांबुळें दीधली : गोसावीया मर्दना दीधली : एरांचीं आंगे उटीलीं : वरिलीकडे ताट : गोसावीयासि केलें : खालिलीकडे टाए एरांसी केले : गोसावीयासि आरोगण जाली : वीडा वोळगवीला : एरां तांबुळें दीधलीं : मग : वऱ्हाड जानवसेया निगालें : गोसावी अनुवर्जनाचेनि मीसें नावेक बीजें केलें : मग तेथौनि पहुडतें स्थाना बीजें केलें : एरी दीसी तेतुलेया वेळा : जानवसेया बीजें केलें : वरिलीकडे बैसले : वऱ्हाडा मुळ आलें : तेयासवें गोसावी बीजें केलें : आधीलें दीसींचियापरी अवघी क्रिया : परियंत : स्वीकरिली : यापरि चाऱ्ही दीस वऱ्हाडीक जाली : चौथां दीसीं : एर ह्मणति एराचें मान्य : एर ह्मणति : एराचें मान्ये : ऐसेंनि संभ्रमें एरयेऱ्हीं वस्त्रें वाइलीं : मग तेथौनि बीजें केलें ॥ एकी वासना : एर एरातें म्हणीतलें : हे तुमचे मान्य : यासी ऐसीं वस्त्रें वावों येति : तवं येरीं म्हणीतलें : हे तुमचे मान्य कीं : तवं येरयेऱ्हीं म्हणीतलें : आमचे नव्हति : आम्हीं म्हणों तुमचे मान्य : तैसेंचि येरीं म्हणीतलें : तवं : सर्वज्ञें ह्मणीतलें : हें तुमचे नव्हे : यांचें नव्हे : हें कव्हणाचेंही नव्हे : ऐसें ह्मणौनि बीजें केलें : तवं तेहीं ह्मणीतलें : एइजो जी : एइजो जी : आम्ही आवघी गोसावीयांचीं मग उभें वर्गीं गोसावीयासि वस्त्रें वाइलीं : मग : गोसावी बीजें केलें ॥ ४८ ॥

गांवी एकी घरीं वऱ्हाड : तेथ बीजें केलें : मांडवीं उभे राहीले : सीधु रे सींधु : परि : सीधातें कोण्ही देखे ना : तवं मांडवीं होते : तेहीं म्हणीतलें : हें नव्हे : आम्ही देखत

असों : देखत असा : तरि : कां बैसा न म्हणां : सोधु : तरि कां बोलावा ना : पुडतीं सर्वज्ञें म्हणीतलें : सीधु रे सीधु : परि : सीधातें कव्हणी देखेना : तथा : वोळखेना : तवं घरीचां अधीष्ठाता बाहीरि निघाला : तेणें म्हणीतलें : एइजो जी : एइजो जी : म्हणौनि : बैसों घातलें : मर्दना मादनें जालें : आरोगणा केली : मग बीजें केलें ॥४९॥

गावीं एकी : गोसावी : उकरडीं पहुड : उदीयांसीचि बाइला राख घातली : ये जवं जवं राख सोहोमी लागे : तवं तवं हें घरघरां घोरे : राखेपाठीं चीपाडें सेण घालितां समइं आंग झाडौनि बीजें केलें : तें माणुसीं देखीलें : मग लोकें म्हणीतलें : आरे : उकरडा व्याला : माणुस जालें : हें गांवा अरिष्ट जालें : आतां शांति करा : खीच पुरीया रंधन केलें : उकरडां जोगीया देसातरीयां वाढीलें : जोगी पात्रें भरूनि जातां गोसावीयां भेटले : जोगी म्हणीतलें : देवव्हो : जा : उकरडा व्याला : गावीं अरीष्ट जालें : तें गावींचा शांतिक केलें : तेथ तुम्हां जेवण होइल : गोसावी तेथ पातळि घालुनि आरोगण केली : मग बीजें केलें ॥५०॥

गावीं एकी संन्यासी दोघीं उघाणी (वादविवाद) करूं आदरीली : गोसावीयातें सभा केलें : जेयाचें स्थळनिरधार होए : तेयातें गोसावी अवलोकीति : तवं एराचें स्थळ निरधार होए : तेयाकडे अवलोकीति : आणि : तेया अपुर्व अपूर्व स्फुरे : यापरी दोघाइं जैत दीधलें ॥५१॥

गावीं एकी संन्यासी दीग्वीजयों करीतु आला : गावींचेया

संन्यासीयासीं उघाणी केली : गावींचेनि संन्यासीयें हारवीलें : तेयाचें मठापत्यें : पूस्तक : भांडार : तेयासि जालें : मळा : वाडु : वृति : हे अवघे तेयासि जालें : मग : गावींचेनि संन्यासीऐं गोसावीयांतें वीनवीलें : जी जी : मठापत्यें गेलें : पुस्तक भांडार गेलें : ऐसें दुख करीत सांघीतलें : गोसावी दोघांइ उघाणी लावीली : पुडती गावींचेया संन्यासीयातें एरें नीरोत्तर केलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : ऐसे हे म्हणत असति कीं : इतुलेनि तेयांसि अपुर्व स्फुरे : पुडतीं तीहीं नीरोत्तर केलें : तवं सर्वज्ञें ह्मणीतलें : ऐसें हें म्हणत असति कीं : इतुलेनि तेयांसि अपुर्व स्फुरे : ऐसेनि गांवींचा संन्यासी एरू जींतला : मग तेयाचें मठापत्य पुस्तक : भांडार : तेयाचें तेयासि जालें : मग तेहीं संन्यासी गोसावीयासि आपुला वोटा संपादीला : गोसावीयासि आरोगण देति : गोसावीया बीजें करूं नेदीति : मग : गोसावी तेयासीं भांडौनि बीजें केलें : तथा : रूसौनि ॥५२॥

गावीं एकी पाणीपात्र करूनि बीजें करीत असति : तवं मागीली कडौनि अधीकार्या एकू मार्गीं जातु असे : तेयाचेनि राउत पाइकें : साबळाचेया बुढीया गोसावीयातें परतें सारिलें : आणि श्रीकरीचें अन्न सांडीलें : मग : गोसावी तेथचि बैसले : उरेंसीं एकू श्रीकरू : धरिला : एरें श्रीकरें भुइचें अनु वेचवेंचु तेथ घालीति : ऐसें अधीकार्ये देखीलें : ऐसें कोणें रे केलें : मग : तेणें दांडीए खाल्लुनि उडी घातली : वीणउं लागला : हें असों दीजो जी : गोसावी नीवांत वेचीतचि असति : सीतें : मग : तोहीं वेंचूं लागला ॥५३॥

सवे उपरि गोष्टि सांघीतली : तरि याही एका वृक्षाची सवे आति : झाडीसि वृक्षाखालि अवस्थान असे : गोसावी पाणीपात्र करूनि पहुडावेया वृक्षाजवळि येत असति : तवं तेथ रामदरणा उतरला : कटकैये जात असे : गोसावी दुसाचेया (तंबूच्या) तनेयावरि (ताण–दोर) श्रीचरण देत बीजें केलें : वृक्षातळि आसन : तवं येरीं ह्मणीतलें : हें कोण कोण : ह्मणौनि : धावत गोसावीयापासि आलें : एक रामदरणेया सांघो गेले : एकु दुसाचिया तणेयावरि पायें देत आला : निवांतु वृक्षाखालि बैसला असे : मग : रामदरणा कळदीवा लाउनि तेथ आला : गोसावीयातें देखीलें : श्रीचरणा लागला : मग : वीनउनि दुसासि घेउनि गेला : मर्दना दीधली : आणि : रामदरणेनि मनोर्थु केला : जे : एवेळेची कटकै परते कां : तरि : मी : गोसावीयातें गावां घेउनि जाइन : तवं कटकै परतावी ऐसीया ज्वाळीया आलीया : गोसावीयासि आरोगण : मग लिखीतें वाचिलीं : मग ह्मणीतलें : जी जी : अळजपुर निकें नगर असे : जी जी : गोसावी तेथ बीजें करावें : सर्वज्ञें ह्मणीतलें : एथ पुर्व दृष्ट असे : जी जी : तेथ बीजें करावें जी : गोसावी वीनवणी स्वीकरीली : मग तेणें वस्त्रें वोळगवीलीं : गरूड घोडा आसना लागि दीधला : सेवक दीधले : गोसावीयाचा परिवारू गोसावीयां सरसा वेगळा चाले : रामदरणेनि अळजपुर (एलिचपूर) श्रृंघारवीलें गावींचा लोकू साउमा (समोर) आला : रामदरणेनि नगरदर्शन गोसावीया देववीलें : रामदरणेयाचिये देव्हारचौके अवस्थान ॥ ५४ ॥

गोसावीयासी उदीयांचि मर्दना मादना होए : मग :

गोसावी प्रतदीनीं अंबीनाथाचेया दारवठां गरूडावरूनि उतरति म्हामाठी गरूडाचीए कानि घालीति : वीहीरिसी गुळळा करीति : श्रीकरें श्रीचरणासि उदकस्पर्शन करीति : मग : अंबिनाथासि वीडा वाति : कदाचीत चौकीं आसन होए : पुराण आइकति : कदाचित बाळाणा टेकौनि आसन होए : पेखणें अवलोकीति : प्रदक्षेणाकरूनि आवारासि बीजें करीति : गरूडासि स्तीति होए : स्तीति चाले : त्या तवं मार्गा चालतां गरूडाची गति क्षाळे : तवं गोसावी पासिला मनुक्षासीं गोष्टी लावीति : मग गोसावी श्रीकरें खांदु थापटीति : मग आवारा भीतरि बीजें करीति : गावींचा लोकू गोसावीयांतें देखौनि म्हणे : रामदरणेयातें लेकी वाढत असे : हे जावाइ करावेया आणिले असति : रामदरणेयाची माता प्रतेहीं श्रीचरणा तुळसी वाए : मग : गोसावीया आरोगण होए ॥५५॥

मग अंबीनाथा प्रदक्षेणा करीतां सूतारू चुना उखरडीत असति : गोसावी तेयातें पुसीलें : हांगा : चुना कां उखरडीत असा : तेहीं ह्मणीतलें : जी जी : नवा चुना केला : सर्वज्ञें ह्मणीतलें : तो चुना जाला असे : येऱ्हवी हाचि निका असे : मग तेहीं चुना जैसा केला : तैसा सांघीतला : सर्वज्ञें ह्मणीतलें : मर्दनीं उणा : मग चुनें जाति निरूपीली : चुना तो ऐसा : खडे ऐसे भाजावे : ऐसीं ऐसीं द्रव्यें होआवीं : येसी मर्दना होआवी : इतुके दीस कुहीजो दीयावा : मग ऐसा वाटावा : मग तो चुना सुनेयां पुढां घालिजे : दहींभाताचा उंडा : म्हणौनि : घे : आणिकांची वास पाहे : तो चुना जाला ऐसें जाणीजे :

ऐसा होए तरि करावा : ना तरी फेडावा ना : तीहीं ह्मणीतलें : जी जी : हें आम्हीं परीसों नेणों : मग : जाणौनि काइ : हें गोसावीचि नीरूपावें : आणि : गोसावीचि परीसावें ॥५६॥

मास दाहा अवस्थान होतें : मग उदास्य स्विकरीलें : अवघें परित्येजुनि पासोडेयाचें वस्त्र पांगरौनि : आरवी वृक्षातळि आसन : एरीकडे गोसावीयांचे सेवक पाहों लागले : तवं गोसावीयातें न देखति : मग तेहीं रामदरणेया पुढें सांघीतलें : तेणें भवतें पाहों धाडीलें : तीए दीसीं गोसावी न दीसतीचि ॥ एरी दीसीं एका सांघीतलें : गोसावी आरवी वृक्षातळि असति : रामदरणां धांवत तेथें आला : तवं तवं गोसावी बीळीचां वेळीं सोमनाथीं होते : दर्सन जालें : ऐसें कां अव्हेरिलें जी : ऐसें वीनउं लागला : गोसावी वीनति न स्वीकरितिचि : मग : तेणें दोघदोघे राखणें दृष्टीचीए आळीवे घातले : वाट वाटे : सर्वज्ञें ह्मणीतलें : जैसें हें तेयाचें काहीं लागे तैसें : मग सोमनाथीं तिन दी अवस्थान : मग एरी दीसीं रामदरणेनि वीनवीलें : जी जी : आवारा बीजें करावें जी : माझी माता श्रीचरणां तुळसी वाइल : तीएसीं पारणें होइल : मग : गोसावीयाचेया प्रत्याये : तैसे गोसावी करीतु : मग : आवारासि बीजें केलें : मर्दन दीधली : मादनें दीधली : पाटाउं त्रीवडि : दुटि : वोळगवीली : माता तुळसी वाइली : मग गोसावीयासि आरोगण जाली : माता पारणें केलें : मग येरीं दीसीं गोसावी बीजें केलें ॥५७॥

वडनेरा काटी वनीं दुटी फाड्डनि पोतुकें केली : तेथें गोपाळ होते : तेयातें ह्मणीतलें : गोपाळ हो : हें दुसी होइल :

तुम्ही ग्राहीक होआ : तीहीं ह्मणीतलें जी जी : काइसेनि घेओं : सर्वज्ञें ह्मणीतलें : चींचोरीचीया आसू करा : दामनियांचे दाम करा : तेहीं ह्मणीतलें : हो कां : जी : मग गोसावी दुसीयाचीया परी दांडी घातली : गोसावी हातासन दाखवीति : गोसावी बहुत सांघति : गोपाळ तोकडेया मागति : यापरि तेयांसि पोतुकें दीधलीं : तेहीं आसू दीधलेया : सर्वज्ञें ह्मणीतलें : निवडक : फुटकया वाटावों लाभे : उरलीं वस्त्रें तेहीं कांटीया सोकरीलिया : फु भोरडीए ह्मणौनि दोनि हातसुडा श्रीमुगुटीं राखीला : दोनि हात सूडा : कटीं प्रदेसीं राखीला : मग गोपाळीं मोटा सोडीलिया : आरोगणा दीधली : मग : बीजें केलें ॥५८॥

वटेश्वरीं आसन : मग गुरुवें ह्मणीतलें : देव हो : एथ देवाचीं उपकरणें असति : तुम्हीं पैलीए देउळीए निद्रा करा : गोसावी पौळी बाहीरि देउळी तेथ पहुडले : रात्रीं दोनि सर्प वक्षेस्थळावरि जूझौनि उरावरि पडीले : तवं गुरूवें ह्मणीतलें : मग काइ केलें देव व्हो : सर्वज्ञें ह्मणीतलें : उरावरि पडिलेया काइ कीजे तें केलें : एणें हातें हा फेडीला : एणें हातें हा फेडीला : इतुलेनि गुरुवासि विस्मयो जाला ॥५९॥

मग **आंबजयेसि** बीजें केलें : वडाचिए खांदिए वरि : आसन : लोंबता श्रीचरणीं : एकीकडे दादोस वटेश्वरासि आले : गुरूवा आणि दादोसां मैत्र : गुरुवें दादोसातें म्हणीतलें : रामा जैसीया पुरूषाचीया गोष्टि कीजति : तैसें पुरूष एथ आले असति : मग : रात्रीची वेवस्था सांघीतली : दादोसीं म्हणीतलें : ते पुरुखू केउते गेले : तेणें म्हणीतलें : आंबजेए गेले : मग दादोस तेथ

आले : श्रीचरणा लागले : मग : गोसावीयासि खालि आसन : दादोसां स्तीति : मग दादोसीं आरोगणे लागौनि वीनवीलें : तेथ घेउनि आले : आरोगण जाली : मग : वटेश्वरीं पहुड : त्रीरात्र एक : अवस्थान : अनुमान ॥६०॥

मग वासनीए बीजें केलें : तेथ वसति जाली : तेथौनि बीजें केलें : वटेश्वरीं दक्षीणे वट्ठ : तेथ आसन : तवं गुरुवें देखीलें : मग तेणें ह्मणीतलें : गोसावी कें बीजें केलें होतें जी : रामू भवतें पाहात होता : तेणें दादोसा पुढें सांघीतलें : मग : दादोस आले : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : दादोसीं क्षेउर केलें होतें : तें गोसावी पूसीलें : तीहीं ह्मणीतलें : जी जी : आमचे पीते वाटे चोरीं उपद्रवीलें : दादोसा ह्मणीतलें : जी जी : आमतें दैवीक पडलें : तरि : गोसावी आरोगणे लागौनि अन्न आणुं येइल : सर्वज्ञें ह्मणीतलें : एइल : तैसें एथ कांहीं नाही : मग दहींभातु वाटा घेउनि आले : गोसावीया आरोगणा जाली : मग दादोसीं ह्मणीतलें : जी जी : गावांमध्यें गोपाळाचें देउळ असे तेथ बीजें करावें जी : मज गोसावीयाचेया दर्शनासि येयावीया सोहपें होइल : रात्रीं गोपाळीं आरोगण : तेथ पहुड होय : उदया गोसावीया बीजें करीतां ह्मणितलें : जी जी : दीस च्यारि राहावें जी : सूतक सरैल मग मीं गोसावीया सरिसा एवों एइल : सर्वज्ञें ह्मणीतलें : हें आतां न व्हये : मग तुह्मी मागीला कडौनि या : तवं तेहीं ह्मणीतलें : जी जी : दर्शन कव्हणें ठाइं देइजैल : सर्वज्ञें म्हणीतलें : हें मेहकर प्रांताकडे होइल ॥६१॥

पातुरडी समसानवस्त्र होतें तें श्रीचरणें स्वीकारीलें : तेथें

माहारू राहातु होता : तेणें ह्मणीतलें : सांडि : सांडि : गोसावी दोही श्रीकरीं धरूनि वस्त्र वीसीर्ण दाखवीलें : मग तो माहारू वीनऊं लागला : स्वीकारिजो जी : जी : निडळ भुइसीं लावी : पुडतीं पुडतीं ह्मणीतलें : परि : न स्विकरितिचि : मग वाळुकेश्वरीं वसति जाली ॥ ६२ ॥

पव्हे आसन : तेथे देवां दर्सन जालें : वीसये जवळि पोखरणीचिए पसीमीली पाळीं : तेथ बीजें केलें : गोसावीयापासि दादोस बैसले असति : परि : गोसावीयाचिए आरोगणेची चींता नाहीं : ना : आपुलेया जेवणाची चींता नाहीं : कांहीं स्फुरेना : तवं एकू ब्राह्मणु तेथ आला : गोसावी तेयातें ह्मणीतलें : भटो यातें जेवावेया नेया : तो देवातें (दादोस) घरां घेउनि गेला : तांबीया पाय धुवावेया दीधला : त्यासि वाढीलें : तवं देवीं ह्मणीतलें : आमचिए पालवीं घाला : आम्ही आपुलेया गोसावीयासि आरोगण देऊनि : मग आह्मी जेउनि : मग दादोस वरणभात घेउनि आले : गोसावीयासि आरोगण दीधली : तेयांसि प्रसादु जाला : मग तेथ वसति जाली : एरी दीसीं देवां पाठवणी जाली मग देवीं ह्मणीतलें : जी जी दर्सन कवण ठाइं दीजैल : सर्वज्ञें ह्मणीतलें : **प्रतेस्थान** प्रांताकडे ॥ ६३ ॥

मेहकरी वाणेश्वराचीए सोंडीएवरि आसन : तवं बोणे बाइया भीक्षे निगालिया : तेहीं गोसावीयातें देखीलें : मग तेहीं म्हणीतलें : बाबा कवणीचि कुसी उसासुनि निगालासि बा : ऐसी कवणि पापीण वीसंवली : गोसावी उगेचि : कोणिकडौनि एइजताए : गोसावी खुणांचि श्रीमुगुटें दाखवीलें : मग तेहीं

म्हणीतलें : हा बा : तरि आपण मौनिदेयां होइजैल : गोसावी मानीलें : मग एकु लाडु पाणीं आणिला : तो गोसावीयासि वोळगवीला : गोसावीयासि एकें सेवखंडें आरोगीलीं : मग तेहीं म्हणीतलें : बा मुनिदेया : आम्हीं भीक्षा मागौनि घेउनि येउनि : तवं एथचि असा : मग तुम्हां आरोगण देउनि : गोसावी मानिलें : मग तेहीं लवलव करूनि भीक्षा घेउनि आली : गुंफे आरोगणा दीधली : भैरवाचें देउळ पहुडावेया दाखवीलें : बा मूनिदेया : ए नगरीं जवं असाल तवं उदेयां एथ पाणीभातु घेयावा : वीळिचा भिक्षा मागौनि एउनि : ते जेवावी : ऐसें म्हणीतलें : स्वीकारीलें ॥ ६४ ॥

एकु दीनी रात्रीं भैरवी पहुडले असति : तवं तेथ जुवारी आले : तेहीं श्रीकंठीं नखें रोवीली : एरी दीसीं उदीयां आरोगण करीतां : बोणें बाइं देखीलें : तेहीं म्हणीतलें : मूनिदेया : बा : हें कंठीं काये जालें : सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ रात्रीं जुवारी आले : तेहीं एथ उपद्रव केला : मग तेहीं बडुवातें म्हणीतलें : आमचेया मूनिदेयासि बाणेश्वरीं नीद्रा करूं द्या : मग : तेथ पहुड करीति ॥ ६५ ॥

मग बोणेबाइचीए गुंफेसि चोरू नीगाला : तो अवघे पदार्थ बाहीरि आंगणा घेउनि आला : तेथ आपुलिये जाडीं : मोट बांधत असे : तवं तीहीं कवाड दाटुनि घातलें : मग बोबाति : धांव बा मूनिदेया : चोरें नागवीलें : बा मुनिदेया : ऐसीया बोबात असति : तवं : गोसावी बीजें केलें : सांचलु पडीला : आणि चोरें वास पाहीली : तवं गोसावीयाची श्रीमूर्ति वाढीनली

देखीली : ऐसनी एकि चोरू पळाला : मोट जाडीची सांडौनि पळाला : मग सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : काइ म्हणत असा बाइ : कां बोबाता : चोरें नागवीलों बा मूनिदेया : उघडा बाइ कवाड : कवाड उघडुनि बाहीरि आली : मग : मोट सोडवीली : पा पा : बाइ : तुमचें काइ गेलें : अमूकें असे : अमूकें असे : ऐसे अवघेही पदार्थ होते : सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : जाडी कोणाची : तेहीं म्हणीतलें : जाडि चोराची : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : तरि : उपराठा चोरुचि नागवीला : मा : ॥ दुसरी वासना : तरि कवणें कवणु नागवीला : बाइ : तवं तेहीं म्हणीतलें : आतां तो जाडिकारणें मागुता येइल : सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : हें एवढें एयातें एसणें एक वाढीनलें देखीलें : तो भीयाला : तो गेला ॥ ६६ ॥

गोकूळ अष्टमीचां दीसीं उदेयाचीए आरोगणे गुंफे बीजें केलें : तवं मातीएचें गोकुळ करीतां देखीलें : मग पुसीलें : बाइ : हें पैल काइ : तवं तेहीं म्हणीतलें : मूनिदेया : तुम्हीं हें नेणा : आज जन्माष्टमी : तवं सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : श्रीकृष्ण काइ मातीएचा : देवकी देवी काइ मातीएची : हें असों देया : तरि काइ करू बा मूनिदेया : सर्वज्ञें म्हणीतलें : हें श्रीकृष्ण होइल तुम्ही देवकी देवी होआ : हो कां बा बा : मग जें करीतें होतीं तें सोडीलें : खाजि तळिलीं : वीळीचां वेळीं गोसावी वीहरणीहुनि बीजें केलें : फुलोरा बांधों लागले : मग व्रतस्ती बाइया गोसावीयासि पूजा केली : गोसावी देवकीएचां उसंगीं रिगाले : मग श्रीकरीं वाण समर्पिलें : गोसावी आरोगण जाली : देवकी देवी जाली : तीयें उपवासू करीतें होतीं : तवं सर्वज्ञें म्हणीतलें :

बाइ : श्रीकृष्ण उपजलें : तें देवकीया देवीं काइ उपवासू केला : मग ते बाइ जेवीली : व्रतस्ता बाइया उपवासू केला : एरी दीसीं उपहारू नीफजवीला : गोसावीयासि मर्दना मादनें पुजा केली : आरोगण जाली : मग तयांसि पारणें जालें ॥६७॥

मार्कंडेवीहीरिसि आसन : तेथ बाइ एकी पाणियां आली : त्या म्हणीतलें : हा बाबा भरि घागरिसि हातु लावा कां : गोसावी श्रीकरू लावीला : यापरी सातां हेळां श्रीकरू लाववीला : वीळी-चां वेळीं तीयेचा भातारू तेथ संध्या करूं आला : तेणें गोसा-वीयातें देखीलें : श्रीचरणा लागला : मग तो घरासि घेउनि आला : गोसावीयासि आसन केलें : मग ब्राम्हणीतें ह्मणीतलें : ए : गोसावीयांचेया श्रीचरणां लाग : ते श्रीचरणा लागली : मग तीयां ह्मणीतलें : एयां गोसावीयां करवीं मियां सातां हेळां श्रीकरू कैसा लावीला : तेणें ह्मणीतलें : चांडाळी : पापीणी : गोसावीया करवि करू कैसा लावीवीला : गोसावीयांचेया श्रीच-रणा लाग : मग : तेणें चरणक्षाळण केलें : वीनवीलें : मग गोसावी तेथौनि बीजें केलें ॥६८॥

मग गोसावी सामान्यस्त्रिहाटें बीजें करीत असति : तवं सामान्यस्त्रिया दोघी एकी घरीचिया एकि साउमि आली : ते वीनवुनि पालवीं धरूनि घरा घेउनि गेली : बाजसूपवतीए वरि आसन : वीडीया करूनि दीधलीया : मग : त्या ह्मणीतलें : जी जी मातें द्रव्य अपार असे : पर ते वायां जात असे जी : तवं एरीं म्हणीतलें : सर ऐसें काइ ह्मणतासि : गोसावी माएबापु : पुडती तीयां ऐसेंचि नीराकारीलें : गोसावी तीएचा शब्द

आइकोनि एरीची वास पाहाति : ॥ महदाईसांप्रति सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ तुम्ही म्हणत असा तें नव्हें : ए म्हणतें असति तें होए : मग तेथौनि बीजें केलें ॥ ६९ ॥

एकू वेळ एरीं हाटवटीया बीजें करीत असति : तवं म्हैसे दोनि जूंझत असति : तडुवीया तडवी पडली असे : माणुसें माळवधा वरूनि पाहातें असति : गोसावीया बीजें करीतां लोकें वारीलें : देव हो : न वचा : न वचा : पुढीं म्हैसे जूंझत असति : गोसावी बीजें केलें : दोहीचि थडक मीळौनि वोसरले होते : गोसावी दोहीतें अवलोकौनि दोहीमध्यें बीजें केलें : मग दोहीचा रोखु नीवर्तला : एकू ऐसा नीगाला : एकू ऐसा नीगाला : मग लोकासि वीस्मयो जाला ॥ ७० ॥

सोमवारीं आली : मग : बोणेबाइ म्हणीतलें : बा मूनिदेया लोगारासि जावों : गोसावी मानिलें : मग बीजें केलें : मग कूमारेश्वरीं आसन : मात्रा गोसावीया पासि ठेउनि बाइया अष्टतीर्थे करूनि आलिया : मग धारेसीं आसन : मग बाइ बीढारीं उपहारू निफजवीला : गोसावीया आरोगण : दैत्यसूदना मागां मढ : तेथ वसति : एरी दीसीं दैत्यसूदना वीहरणा बीजें केलें : बाइया अष्टतीर्थीया करूनि उपहारू निफजविला : गोसावीया आरोगण : मग पहूडानंतरें ह्मणीतलें : बा मूनिदेया लोकु निगाला : आतां गावां जावोंना : गोसावी बीजें केलें : मार्गीं वृक्षाखालि आसन : जूंझमालीं आसन : गोसावीया तेथौनि बीजें केलें : यानंतरें चोरू बाइया देखीलें : मग तीहीं बाइ म्हणीतलें : बा मूनिदेया चोर चोर बाबा : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ भीया ना : पुढां चाला :

तवं आले : उभे राहीले : सर्वज्ञें ह्मणीतलें : कांगा माहात्मे हो जेहुनि तुम्ही आलेति ते कां वर्तना कीजेना : तवं तेहीं म्हणीतलें : जी जी : गोसावीयाचां ठाइं काइ : गोसावी अवलोकीलें : आणि तेहीं म्हणीतलें : गोसावीया सरीसें कोण्ही माणुस नाहीं : गोसावीया म्हणीतलें : महात्मे हो : तुम्हीं असा नव्हे : काइसी अवळ : मग गोसावी तयासि पुडवाटवा झाडौनि तांबुळ दीधले : पाठवणी दीधली : तवं तेहीं ह्मणीतलें : जी जी : आमचें पुढां आणिक असति : तें गोसवीयाचां ठाइं उपद्रो करीति : सर्वज्ञें म्हणीतलें : तैसें एथ कव्हणी काइ न करी : ऐसांहीं ते सरीसे आले : सोंदरासंगमीं आणिक चोर भेटले : एरएन्हीं गोसावीयातें गांववेन्ही बोळवीत आले : मग : तेयासि पाठवणी जाली : ते गावांमध्यें गेले ॥७१॥

सीहस्तु आला : मग बोणेंबाइ म्हणीतलें : बा मूनिदेया त्रीयंबका जावों : गोसावी मानिलें : गोसावीयासि दुणिची आंगी टोपरें सीत्रीलें : उपाहानउ बांधलिया : सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : ओझें काहीं घेवों नोको : मार्गीं काइ मीळैल : वाटे मीळैल : तेहीं म्हणीतलें : मूनिदेया : बा : बा : साना गावीं वीसजून जोडे : ऐसांही आइती : तरि थोडी बहुत तन्ही घेओं : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : हें पुढां जोडैल : मग बीजें केलें ॥७२॥

मार्गीं नदी उतरतां उपाहानौ फेडीलीया : तीया तेथचि टाकौनि बीजें केलें : बाइया पुढें चालती होतीया : तेहीं मागील वास पाहीली : तवं उपाहानौ न देखतिचि : मग तेहीं म्हणी-

तलें : बा मूनिदेया उपानहौ काइ केलीया : सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : जा : तीया तेथचि असति : कटकट : बा मूनिदेया : आम्हांपुढें सांघतेति कां तरि आम्हीं घेतों कीं : मग आणिकी उपाहानउ बांधलीया : दुसरी वासना : तियाचि आणिलिया : तीए दीउनि नदी देखति आणि मागें राहाति : उपाहानउ हातीं घेति : मग नदी उतरलेयां मेळवीति ॥७३॥

पेणें पावलेयां एकाधा **कापडवीये** आसन होए : गावीचा लोकु गोसावीयांतें देखौनि कणिक : तांदुळ : तुप : ऐसें आवघें घेउनि येति : मग : ते आवघे बाइया बीढारा घेउनि जाति : गोसावी म्हणति : आवघें वेचा : ठेवाना : मग बाइं म्हणीतलें : बा मूनिदेया : एथ तुम्ही चुकाल : तरि : बीढारां या कां जावों : मग मागुतेयां सर्वज्ञें म्हणीतलें : बाइ : ऐसें एईल चोजवीत : चोजवीत : गोसावी असति कां नदी : बाइयांसि रधन करूं सरे : मग : वाट पाहाति : आणि गोसावी बीजें करिति : गोसावीयासि आरोगण होए : मग पहुड आणिके स्थानीं होए : गावां उदेयांचि मार्गीं गोसावी बाइयांसि पारूखति : जरि बाइया पुढां एति : तरि तीया पारूखति : मग : तेथ भेटी होए : मग साउमे चालति ॥७४॥

एयापरी क्रमें क्रमें **रावसगावां** बीजें केलें : तो गांवो तीर्थाचा ह्मणौनि सीदौरि न ठेवीतिचि : मग **सीधन.थीं माहादेवो पाठकांचीए** गुंफेसि बीजें केलें : तेहीं पाणीभातु बाबूळसेंगा ऐसी आरोगण दीधली : सीळें आरोगण : मग रंधन जालेया तेथ बीजें केलें : बाइं ह्मणीतलें : बा मूनिदेया आजि भूकेलेति : मग गोसा-

वीया आरोगण : तेथ अवस्थान : कवणीं ठाइं ते नेणीजे ॥७४॥

मग क्रमें क्रमें प्रतिस्थानासि बीजें केलें : भोगावतिएसि राहीले : तेथ बाइ ह्मणीतलें : बा मूनिदेया हें थोर नगर : एथ तुम्ही चुकाल : बिढारासि जावोंया : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : एइल ऐसें चोजवीत चोजवीत : बाइया बाईसाचीए गुंफे गेलीया : पै : बो : नागुबाई आह्मांसरिसे एक मूनिदेव असति : काइ सांगों तेयाचें सौंदर्य : मग : आश्चर्यें अनुभवीची सांघौनि मग बीढारा नीगालिया : मग : बाइसासि ते पुरुखु देखी- जति ऐसी चाड उपनली : तवं पाहारा अढैचां भोगावतीचिया खांडी नगरामध्यें बीजें केलें : बाइसें वामदेवाचीए गुंफे जात असति : पार्वती सोमनाथापासि भेटी जाली : बाईसीं मनीं म्हणीतलें : ऐसें पुरुष ए नगरीं तवं नसति : हे तेचि होती : मग आउसीं गोसावीयातें पूसीलें : आपण कवणीं कडौनि येइजत असे : गोसावी श्रीमुगुटें खूणां दीशा सांघीतली : तवं बाईसीं म्हणीतलें : लोणारा मेहकरा कडौनि : गोसावी मानिलें : मग आउसीं म्हणीतलें : आमचिए मढीएसि चाला : गोसावीयासि पाए पुसणें बैसावेया घातल : मग आउसीं ह्मणी- तलें : हांसूबाई महात्मेयांसि पाणी भातु दीया : गोसावीयासि दूधी करटा आरोगण : मग भोगनारायणीं पहुड केला : बोणे- बाइ पाहारू एकू वाट पाहीली : मग ह्मणों लागली : आजि मुनिदेव आझुइं न एतिचि : तरि काइ चुकलें : हें थोर नगर : परि : चुकती कीरू ना : ना नरि कव्हणी जेवावेया नेले असति : ऐसें वेवस्तुनि : मग तीयें जेवीली ॥ * ॥ * ॥ * ॥

समाप्त